सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, ०५ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८२ | पाने : ८+ आसमंत पुरवणी | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील दोन आरोपींना पुण्यात ठोकल्या बेड्या

बीड : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील नवीन महत्त्वाची माहिती समोर आली आहे. वाल्मिक कराड शरणागतीनंतर संतोष देशमुखांची हत्या करणाऱ्या आरोपींपैकी फरार असलेल्या ३ आरोपींपैकी दोघांना २५ दिवसांनी अटक करण्यात आली आहे. मात्र अजूनही एक आरोपी फरार असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस तिसऱ्या फरार आरोपीचा कसून शोध घेत आहेत. उखऊ पथक आणि डखढ द्वारे करण्यात येत असलेल्या संयुक्त तपासाद्वारे दोघांनाही ताब्यात घेण्यात आलं आहे.

संतोष देशमुख हत्ये प्रकरणी सुरुवातीला विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले आणि महेश केदार या चार आरोपींना ताब्यात घेण्यात आलं होतं. तर आरोपी सुदर्शन चंद्रभान घुले , कृष्णा शामराव आंधळे, सुधीर ज्ञानोबा सांगळे हे फरार होते. या आरोपींना पकडण्यासाठी प्रसिद्धीपत्रक जारी करत फरार घोषित करण्यात आलं होतं. त्यानंतर आता सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आलं आहे. तर कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. दोन्ही आरोपींना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. सुदर्शन घुलेच या हत्येमागचा मुख्य आरोपी आहे असं म्हटलं जात आहे.

मुंबईच्या वांद्र्यात भीषण आग, २५ ते ३० झोपड्या जळून खाक

मुंबई : मुंबईत गेल्या काही दिवसांपासून आगीचं सत्र सुरुच आहे. मुंबईच्या वांद्रे परिसरात आग लागल्याची घटना घडली आहे. याचदरम्यान आता मुंबईतील वांद्रे परिसरात आग लागल्याची घटना घडली आहे. या परिसरातील झोपड्यांना आग लागली आहे. या परिसरातील झोपड्यांना आग लागली आहे. या आगीमुळे संपूर्ण परिसरात धुराचे प्रचंड लोट पाहायला मिळत आहे. आग लागल्याची घटना घडताच अग्निशमन दलाच्या ३ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या वांद्र पूर्व परिसरात भीषण आग लागल्याची घटना घडली होती. मुंबईच्या वांद्रे पूर्व भागातील भारत नगर परिसरात ही मोठी आग लागली आहे. भारतनगर परिसरातील खाडी किनाऱ्यावरील तिवराचे जंगल आणि कचराकुंडीला मोठी आग लागली आहे. परिसरात धुराच या आगीच २५ ते ३० कच्च्या झोपड्या जळून खाक झाल्या आहेत. भारतनगर परिसरात लागलेल्या आगीमुळे धुराचे प्रचंड मोठं लोट पसरले आहे. आग लागल्याची माहिती परिसरात बघणाऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. या भीषण आग लागल्याच्या घटनेनंतर ३ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आहेत. आपत्कालीन सेवांनी तातडीने प्रतिसाद देत अग्निशमन दलाच्या ५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याचे वृत्त नाही. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि पुढील नुकसान टाळण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान अथक प्रयत्न करत आहेत. आगीचे कारण अद्याप समजले नसून परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर तपास केला जाईल. आगीमुळे बाधित कुटुंबांना आधार मिळत आहे कारण अधिकारी घटना आटोक्यात आणण्यासाठी त्यांचे प्रयत्न करत आहेत.

इस्त्रोने अंतराळात अंकुरीत केली चवळी

बंगळुरू, ०४ जानेवारी : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्त्रो) मोठी कामगिरी बजावली आहे. इस्त्रोला अंतराळात चवळी अंकुरीत करण्यात यश मिळाले आहे. इस्त्रोने ३० डिसेंबर रोजी ही मोहिम हाती घेतली होती. त्यानंतर अवघ्या ४ दिवसात अंतराळात जीवन अंकुरीत करण्यात यश मिळाले आहे.

इस्त्रोने ३० डिसेंबर २०२४ रोजी श्रीहरिकोटा येथून अंतराळ डॉकिंग प्रयोग मोहीम सुरू केली होती. या अंतर्गत पीएसएलव्ही-सी-६० रॉकेटच्या साह्याने पृथ्वीपासून ४७० किमी वर दोन अंतराळ यान तैनात करण्यात आले. पीओईएम-४ (पीएसएलव्ही ऑर्बिटल एक्सपेरिमेंटल मॉड्युल) वर क्रॉप्स (कॉम्पॅक्ट रिसर्च मॉड्यूल फॉर ऑर्बिटल प्लांट स्टडीज) सोबत पाठवलेल्या अंतराळात प्रथमच जीवन अंकुरित करण्यात यश आले आहे. विक्रम साराभाई स्पेस सेंटर येथे तयार केलेल्या सीआरओपीएसने चवळीच्या बिया फक्त ४ दिवसात अंकुरीत केल्या असून त्याला लवकरच पाने येण्याची अपेक्षा आहे. चवळी लवकर उगवत असल्याने इस्त्रोने प्रयोगासाठी चवळीच्या बियाण्याची निवड केली होती. तसेच चवळी पौष्टिक वनस्पती असल्याने इस्त्रोचा हा प्रयोग अंतराळात अन्न वाढवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे, जे भविष्यात चंद्र, मंगळ किंवा इतर ग्रहांवर मानवी उपस्थिती टिकवून ठेवण्यास मदत करेल. चेझर मॉड्यूलने अंतराळात इन-ऑर्बिट स्पेस सेल्फी व्हिडिओ रेकॉर्ड केला आहे. अंतराळात अचूक डॉकिंगची पडताळणी करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे आणि मिशन योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचा पुरावा हा व्हिडिओ देतो. लक्ष्याच्या दिशेने जात असताना हा व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात आला. गेल्या २ जानेवारी रोजी त्याचे आंतर-उपग्रह अंतर ४.८ किमी होते. दोन्ही स्पेसक्राफ्टच्या डॉकिंगचा रिअल टाइम व्हिडिओ देखील प्रसिद्ध केला जाईल.

संशोधन आणि विकासाशी संबंधित २४ पेलोड देखील स्पेस-एक्स सोबत पाठवण्यात आले. हे पेलोड पृथ्वीपासून ७०० किलोमीटर उंचीवर डॉक केलेले आहेत. यापैकी १४ पेलोड्स इस्त्रोचे आहेत आणि उर्वरित १० स्टार्टअप आणि शैक्षणिक संस्थांचे आहेत. यापैकी एक प्लान्ट एक्सपेरिमेंटल मॉड्यूल इन स्पेस हे पेलोड ऍमिटी विद्यापीठाने तयार केला आहे. अवकाशात वनस्पतींच्या पेशी कशा वाढतात याचे संशोधन केले जाईल.या संशोधनांतर्गत अवकाशात आणि पृथ्वीवर एकाच वेळी प्रयोग केले जाणार आहेत. पालकांच्या पेशींना सूर्यप्रकाश आणि पोषक तत्त्वे यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी एलईडी लाईट्स आणि जेलच्या माध्यमातून पुरवल्या जातील. कॅमेरा वनस्पती पेशींचा रंग आणि वाढ रेकॉर्ड करेल. जर सेलचा रंग बदलला तर प्रयोग अयशस्वी होईल.

अणुशास्त्रज्ञ आर. चिदंबरम यांचे निधन

मुंबई, ०४ जानेवारी : देशातील ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ राजगोपाल चिदंबरम यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. चिदंबरम यांनी पहाटे ३.२० वाजता मुंबईच्या जसलोक रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. त्यांनी अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम केले. चिदंबरम यांना १९७५ आणि १९९९ मध्ये पद्मश्री आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

गेल्या काही दिवसांपासून चिदंबरम यांची प्रकृती ठीक नव्हती. शास्त्रज्ञ म्हणून डॉ. चिदंबरम यांनी भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव म्हणून काम केले होते. तसेच १९९४-९५ दरम्यान आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीच्या संचालक मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. डॉ. चिदंबरम हे भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागारही होते. डॉ. चिदंबरम यांनी भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावली - पोखरण-ख (१९७५) आणि पोखरण-२ (१९९८) च्या चाचणी तयारीचे आयोजन. अणुऊर्जेच्या शांततापूर्ण वापराचे समर्थक, त्यांनी भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाचे नेतृत्व केले. डॉ. चिदंबरम यांना पद्मश्री (१९७५) आणि पद्मविभूषण (१९९९) यांच्यासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

शिर्डी महापरिक्रमेचा उद्घोषणा सोहळा डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न

नगर : ग्रीन एन क्लिन शिर्डी फाऊंडेशन आणि शिर्डी ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने येणाऱ्या १३ फेब्रुवारीपासून शिर्डी महापरिक्रमा २०२५ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या पार्श्वभूमीवर आज शिर्डी महापरिक्रमेचा उद्घोषणा सोहळा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विविध मान्यवरांसह परिसरातील असंख्य नागरिक व भाविकांनी उपस्थिती दर्शविली.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते महापरिक्रमेची विधिवत उद्घोषणा करण्यात आली. याप्रसंगी त्यांनी महापरिक्रमेच्या माध्यमातून अध्यात्म, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. तसेच या कार्यक्रमादरम्यान भजनांच्या सुरेल तालावर तयार झालेल्या आनंदमय वातावरणात मान्यवर आणि ग्रामस्थांसमवेत सहभाग घेत पाहुली या पारंपरिक नृत्याचा आनंद घेतला व सोहळ्याची रंगत वाढविली.

शिर्डी महापरिक्रमेचे वैशिष्ट्य म्हणजे गव्हाच्या पिकांची पाहणी आणि चित्रीकरण करणे. त्यामुळे सोहळ्यास उपस्थित सर्वांनी शिर्डी परिक्रमेच्या निमित्ताने शेतांमधील गव्हाच्या पिकांची पाहणी केली. तसेच परिक्रमेदरम्यानच्या दृश्यांचे चित्रीकरण देखील करण्यात आले. त्याद्वारे या अनोख्या परंपरेचा अनुभव सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे.

या सोहळ्याला श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, शिरीष वमने (उपविभागीय पोलीस अधिकारी), महंत काशिकानंदजी सरस्वती महाराज, ग्रीन एन क्लीन शिर्डीचे अजित पारख, तसेच अभयभैय्या शेळके, गोपीनाथ बापू गोंदकर, विजयराव जगताप, दिगंबर कोते, ड. अनिल शेजवळ, गणेश कोते, डॉ. जितेंद्र शेळके, नितिन शेळके, प्रताप जगताप यांसारख्या अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

यावेळी डॉ. सुजय विखे यांनी शिर्डी महापरिक्रमा हा उपक्रम केवळ धार्मिक सोहळा नसून, तो सामाजिक एकात्मता आणि निसर्गप्रेमाचा संदेश देणारा सोहळा आहे, असे स्पष्ट केले. तसेच सर्व उपस्थितांनी शिर्डी महापरिक्रमेला भविष्यात अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या संकल्पाने सदरील कार्यक्रमाची सांगता केली.

तामिळनाडू : फटाका कारखाना स्फोटात ६ जणांचा मृत्यू

विरुधूनगर, ०४ जानेवारी : तामिळनाडूच्या विरुधूनगर जिल्ह्यातील सत्तूर भागातील अप्पैया नायक्कनपट्टी येथील साईनाथ फटाका कारखान्यात मोठा स्फोट झाला आहे. या घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. विरुधूनगर येथील फटाके निर्मिती कारखान्यात आतापर्यंत ६ मृतदेह सापडले आहेत. घटनास्थळी बचावकार्य सुरू असल्याची माहिती अग्निशमन आणि बचाव विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार, स्फोटानंतर कारखान्यातील ४ खोल्या कोसळल्यात. स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, परंतु फटाके तयार करताना विद्युत गळती किंवा स्फोटकांमधील घर्षणामुळे स्फोट झाला असावा असा संशय आहे. स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना वाचवण्यात आले आहे आणि त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तामिळनाडूतील फटाका कारखान्यांमध्ये यापूर्वी देखील स्फोटाच्या घटना घडल्या आहेत. विरुधूनगर जिल्ह्यातच यापूर्वी झालेल्या २ स्फोटाच्या घटनांमध्ये १४ जणांचा मृत्यू झाला होता. यातील पहिली घटना रंगापलयम परिसरात झाली होती. याठिकाणी फटाक्यांच्या चाचणीदरम्यान झालेल्या अपघातात १२ महिलांसह १३ जणांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी तामिळनाडू सरकारने मृतकांच्या वारसांना ३ लाख रुपये आणि जखमींच्या उपचारासाठी १ लाखांचा मतद निधी दिला होता.

शिक्षण तज्ञ शकुंतला कानडे यांचे निधन

येवला, ४ जानेवारी, : मराठी नाट्य व सिने अभिनेत्री, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व आपल्या येवल्यातील साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका शकुंतला सतीश कानडे यांचे दुखद निधन झाले

पती स्व. सतीश कानडे यांच्या साथीने त्यांनी शिक्षणक्षेत्रात व कला क्षेत्रात उल्लखेनीय काम केले. १९७७ साली 'तुझे आहे तुजपाशी' हा पहिला नाट्यप्रयोग आपल्या येवल्यातील जनता विद्यालयात साकारला आणि नंतरच्या काळात वैभव नाट्यमंडळाच्या माध्यमातून नाट्यचळवळ जिवंत ठेवण्याचे काम नेटाने केले. त्यांच्या अनेक नाटकांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. शिवरायांचे आठवावे रूप, जय सप्तशृंगी माता, वैभव लक्ष्मी माता या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका साकारल्या. शकुंतला ताईंनी शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय काम करत उत्कृष्ट व्यवस्थापन, अध्यापन अशा विषयांमधील पुरस्कारांवरही आपले नाव कोरले.

अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या येवल्याच्या शकुंतला सतीश कानडे यांचे दुःखद निधन झाले

तसेच माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ येवल्याचे आमदार यांनी या दुखद: घटनेचे दुःख व्यक्त केले आहे

मुंबईत ४.८४ कोटी रुपये किंमतीचे सोने जप्त

मुंबई, ४ जानेवारी : मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ड्युटी फ्री दुकानात काम करणाऱ्या आणि सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीशी संबधित विमानतळ कर्मचाऱ्यांच्या गटाला महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) ताब्यात घेतले. हे कर्मचारी आंतरराष्ट्रीय ट्रान्झिट टर्मिनलमधून छोट्या गटांमध्ये आणलेले सोने विमानतळाबाहेर पोहोचवून त्याची तस्करी करत होते. विमानतळाबाहेर तस्करीचे सोने घेऊन जात असताना डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी विमानतळाच्या दोन कर्मचाऱ्यांना अडवले. त्यानंतर केलेल्या कारवाईत ते सोने ताब्यात घेणाऱ्या दोन जणांना देखील ताब्यात घेतले. तपासणी दरम्यान ५ अंडाकृती आकाराच्या कॅप्सूल आणि मेणाच्या स्वरूपातील सोन्याच्या भुकटीची २ पाकिटे आढळून आली. चौकशी नंतर, ४.८४ कोटी रुपये किमतीचे ६.०५ किलो सोने जप्त करण्यात आले. मेणाच्या स्वरूपातील (६.०५ किलो) ४.८४ कोटी रुपये किमतीची सोन्याची भुकटी जप्त करण्यात आली, आणि सीमा शुल्क कायदा १९६२ च्या तरतुदींनुसार चारही जणांना अटक करण्यात आली.

अजिंठा घाटात लक्झरी ट्रकाची समोरासमोर धडक; १० प्रवाशी जखमी

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, ४ जानेवारी

जगप्रसिद्ध अजिंठा घाटात अपघाताची मालिका सुरूच असून गुरुवारी (दि.२) रात्री १० वाजेच्या सुमारास लक्झरी बस मालट्रक यांच्यात समोर समोर धडक होऊन झालेल्या अपघातात सुमारे ८ ते १० प्रवसी गंभीर जखमी झाले आहेत.या अपघातामुळे नित्याप्रमाणे सुमारे चार,पाच तास वाहतूक रहदारी पूर्णतः ठप्प झाली होती तर अपघातात मालट्रक मध्ये जखमी झालेला चालक अपघात घडल्यानंतर सुमारे दीड ते दोन तास ट्रकच्या स्टेरींगखाली फसून अडकलेला होता.मात्र ग्रामस्थांनी जेसीबी मशीन च्या साह्याने मोठ्या परिश्रमाने व शिताफीने अडकलेल्या त्या चालकासह जखमी प्रवाश्यांना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पाठविले.गुरुवारी रात्री १० वाजेच्या सुमारास भरधाव वेगाने अजिंठा घाट चढत असलेली लक्झरी बस (एमएच १९ वाय ७६५०) ही जळगाव कडून पुण्याकडे जात असताना समोरून घाट उतरत असलेल्या मालट्रक (एमएच २१ बिएच ९८२५) यांच्या समोरा समोर जोरदार धडक झाली.यात बेडीराम पंढरीनाथ कोल्हे (३०) रा.जालना,भुसावळ येथील निलेश कौतिक पाटील (३२),सुरज कैलास महाजन (३५),मानसी भाऊसाहेब गायकवाड (२५),राजेंद्र सुपडू कापसे (२८) रा.जामनेर,अदनान शेख इब्राहीम (१९) रा.सौदा रावेर,अखिलेश वाघले (२५) ब्रह्मनोद यावल,गजानन सुरेश बनोटे (३०) रा.महालवाडी आदी गंभीर झाले असून त्यांच्यावर अजिंठा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले आहे.

गंभीर अवस्थेत चालक अडकला सुमारे दीड दोन तास... अजिंठावासियानी काढले सुखरूप अपघात होऊन गंभीर जखमी झालेल्या पर्यंत मोठ्या जिकरीने पोहचून अजिंठा येथील तरुणांनी लक्झरी बस मधील जखमींना बाहेर काढले तर स्टेरिंग मध्ये फसून अडकलेल्या चालकास सुमारे दीड दोन तास अथक परिश्रम घेऊन तरुणांनी मोठ्या शितफितीने सुखरूप बाहेर काढून सर्व जखमींना उपचारासाठी रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पाठविले.

रहदारी विस्कळीतची किर किर सुरूच..चार पाच तास वाहतूक पुन्हा ठप्प..

रात्री सुमारे १० वाजेच्या सुमारास झालेल्या या अपघातामुळे छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक सुमारे चार ते पाच तास पूर्णपणे ठप्प झाली होती.यामुळे पर्यटकांसह प्रवाश्यांना पुन्हा एकदा तासोन तास तातकडावे लागले.अनेकांनी रहदारी न अडकता इतरत्र मार्गातून वाट काढणे पंसत केले.

महामार्ग झाले बदनाम... पर्यटनावर बसला मोठा फटका..

जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांना जोडणारा छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्ग अनेक ठिकाणी रखडल्यामुळे,बोगस झालेल्या कामामुळे खड्डे बनून खरबडे बनलेले रस्ते व अरुंद बनलेला जगप्रसिद्ध अजिंठा घाटामुळे वारंवार होत असलेलं अपघात व वाहतूक रहदारी ठप्प होण्याची दिवसोन दिवस घडत असलेल्या घटने मुळे प्रवाशी,पर्यटकांना,रुग्ण आदींना तासोंनतास अडकावे लागत असल्याने महामार्ग बदनाम झाला आहे.यामुळे नेहमीच नाताळच्या सुट्यात पसंत असलेल्या पर्यटकांनी यंदा पाठ फिरविल्याचे दिसून येत असून केवळ एक दोन दिवस वगळता सलग सुट्या असून ही परिसरात शुकशुकाट पसरल्याने पर्यटनावर आधारित व्यावसायिकांना मोठा फटका बसल्याचे दिसून येत आहे.

CMYK

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

फार्मसी डिप्लोमाधारकांना पीसीआयकडून तात्पुरत्या नोंदणीस मान्यता

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.४ जानेवारी -

फार्मसी डिप्लोमा झालेल्या विद्यार्थ्यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून तात्पुरत्या नोंदणीस मान्यता देण्यात आली आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (झउख) ने डिप्लोमा इन फार्मसी एक्झिट परीक्षा नियम ावली २०२२ संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एक्झिट परीक्षेतील पेपरांची संख्या तीनवरून एक करण्याचा प्रस्ताव अद्याप सरकारकडून मंजूर झालेला नसल्यामुळे, झउख ने २०२२-२३ शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या व २०२३-२४ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना तात्पुरती नोंदणी देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व राज्य फार्मसी कौन्सिल व राज्य सरकारांना या विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी तात्पुरती नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थी फार्मासिस्ट म्हणून काम करू शकतील, मात्र एक्झिट परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय नोंदणी नूतनीकरण करता येणार नाही. विद्यार्थ्यांनी झउख द्वारे दिलेल्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (ॲफिडेव्हिट) भरून राज्य फार्मसी कौन्सिलच्या निबंधकांकडे सादर करणे आवश्यक आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांना बेरोजगारीपासून वाचवण्यासाठी तसेच नियम ानुसार पारदर्शकता राखण्यासाठी घेण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी अशी माहिती प्राचार्य डॉ. पौळ यांनी दिली आहे.

संक्षिप्त वृत्त...

इंटर युनिव्हर्सिटी बुद्धीबळ स्पर्धेत सुयश

निलंगा, दि.४ जानेवारी -

इंटर युनिव्हर्सिटी बुद्धीबळ स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या बुध्दीबळ संघाचे नेतृत्व निलंगा शहरालगत असलेल्या दापका येथील जय भारत कॉलेज ऑफ फार्मसीचा वैभव नरेवाड करणार आहे. जय भारत कॉलेज ऑफ फार्मसी दापका (ता.निलंगा) येथील वैभव नरेवाड हा बी फार्मसीच्या तीसऱ्या वर्षात शिकत असून, या विद्यार्थ्याने मागील वर्षात विविध बुद्धीबळ स्पर्धांमध्ये दैदीप्यमान यश संपादन करून, मागच्या म हिन्यात घेण्यात आलेल्या अंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत, आत्ता तो देश पातळीवर, अंतर विद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेच्या, स्वामी रा. तिर्थ म. विद्यापीठाच्या संघाचे नेतृत्व करत आहे. देशपातळीवरील या स्पर्धा भोपाळ मध्यप्रदेश येथे दि.६ व ७ जानेवारीला होत आहेत. या यशाबद्दल त्याचे संस्थेची कार्याध्यक्ष वसंतराव पाटील, अध्यक्ष राजेश्वर पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकृष्ण शिंदे, प्रशिक्षक डॉ. संपत सोळुंके, अनिल भोईबार व समस्त कर्मचाऱ्यांनी तोंडभर कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संगीता मोतीपवळे सार्वजनिक वाचनालयात सामुहिक ग्रंथवाचन

उदगीर, दि.४ जानेवारी -

संगीता मोतीपवळे सार्वजनिक वाचनालय नवीन वसाहत मलकापुर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत सामुहिक ग्रंथ वाचन संपन्न झाले. प्रारंभी अक्षरनंदन मराठी प्राथमिक शाळेचे विद्यार्थिनी समगे रिद्दी व प्रणाली तोडकर यांच्या हस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमेचे पुजन करण्यात आले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपकृमा अंतर्गत यावेळी विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथवाचन केले तर विद्यार्थयांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर भाषणे केली. या उपकृमात अक्षरनंदन शाळेतील वर्गशिक्षक एम.जी. बिरादार, विद्यार्थीनी समृध्दी तेलगे, भाग्यश्री सुर्यवंशी, कोमल केंद्रे, अनिकेत जीवने, स्नेहा हलकरे, संचिता मुंडे, सृती जाधव, वैष्णवी येणगे, स्नेहा बरगाले, सृष्टी गायकवाड, सृष्टी कंजे, सृष्टी मोरे, वैभवी कोरे, प्रणिता होनराव, आर्या सोलापुरे, अज्ञा कोडे, प्रणाली तोडकर, प्रतिक्षा भालशंकर, श्रध्दा दुवे, प्रतिक्षा बिरादार, वैभवी जाधव, प्रेरणा बिरादार, अवधुत शिंदे, संस्कार पिटले, आर्यन सुतार, साईराज मोटेराव, श्लोक करखेलीकर, हर्षद टेकपुंजे, श्रेयश कारलेवाड, पार्थ वाडकर, प्रणव दंडिमे, विवेक भाडसंगे, अदित्य सुर्यकर, कपिल मुंडे, प्रथमेश सुर्यवंशी, गौरव रोडगे, अजिंक्य ढवळे, उत्कर्ष बेंबडे, ओमकार किरवले, रामेश्वर सुर्यवंशी, विठ्ठल जाधव श्रीनिवास वाकळे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

आदर्श दर्पण पुरस्कार जाहीर

कळंब, दि.४ जानेवारी -

६ जानेवारी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. कळंब येथील सेवा पुरस्कार समितीच्या वतीने पत्रकारितेच्या माध्यमातून व आपल्या लेखणीतून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक व सामाजिक प्रश्न मांडणाऱ्या उत्कृष्ट लेखन व वृत्तांकन करणाऱ्या उत्कृष्ट पत्रकारांचा आदर्श दर्पण पुरस्काराने सन्मान केला जातो.

४० वर्षापासून वादात असलेला रस्ता तहसीलदाराने शेतकऱ्यांसाठी केला खुला

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.४ जानेवारी -

निलंगा तालुक्यातील जाजनूर येथील गेल्या ४० वर्षापासून वादात अडकलेला शेतरस्ता शेतकऱ्यासाठी तहसिलदार प्रसाद कुलकर्णी यानी खुला करून दिला आहे.

दि.३ रोजी जाजनूर येथील नकाशावरील जाजनूर गाव ते शेख वस्तीपासून निलंगा शहराकडे जाणारा जुना रस्ता तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहमतीने बैठक घेऊन मागील ४० वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता प्रत्यक्ष जाजनूर गावात जावून मोजणी करून खुला करून देण्याचे काम केला आहे. तर गेल्या वर्षी अतिक्रमण मुक्त करून मातीकाम करण्यात आलेला जाजनूर स्मशानभूमी पासून सावनगिरा- तळीखेड जाणाऱ्या रस्ता मजबुतीकरणाच्या कामाची तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी पाहणी केली. तसेच गावातून शेख वस्तीकडे जाणारा गावठाणलगतचा रस्ता शेतकरी वादात प्रलंबित होता. गावठाणा लगत असलेल्या शेतकऱ्यांच्या जामनीच्या हद्दी खुणा कायम करून देण्यात आल्या व त्यानंतर जाजनूर लांबोटा शिव ते अंबुलगा साखर कारखाना जाणाऱ्या रस्त्यावरील पुल टाकण्याचे काम काही कारणास्तव रखडले होता, तेथे तहसीलदार स्वता: उपस्थित राहून दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्व पटवून दिले व पूलाचे रखडलेले काम जागेवर उपस्थित राहून पुर्ण करून घेतले. जाजनूर गावात एकाच दिवसात एकूण चार रस्त्याचे विविध कारणाम ुळे रखडलेले काम पुर्ण करून रस्ता कामाला गती देण्याचे खूप मोठे कार्य तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी केले आहे.

वरील चारही रस्त्याच्या काम ाला गती देण्यासाठी मंडळ अधिकारी निलंगा राजकुमार देशमुख, ग्राम म

हसूल अधिकारी (तलाठी) जाजनूर पद्माकर रत्नपारखे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) निलंगा सदानंद सागावे, भूमी अभिलेख कार्यालयाचे कर्मचारी प्रशांत गाडेकर, पोलीस कर्मचारी गोपाळ बरडे, जाजनूर गावचे सरपंच काशिनाथ गोमसाळे, माजी सरपंच बालाजी गोमसाळे, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम गोमसाळे, तंटामुक्ती उपाध्यक्ष इकबाल सय्यद गावचे जेष्ठ नागरिक अरविंद पाटील, विनायक गोमसाळे, चांद शेख व रस्त्याच्या दोन्ही बाजूचे सर्व शेतकरी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

रंगकर्मी प्रतिष्ठान, मराठी पत्रकार संघाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

८ फेब्रुवारीला होणार पुरस्कार वितरण सोहळा... चाकूरच्या दोन पत्रकारांचा समावेश...

तभा वृत्तसेवा
चाकूर, दि.४ जानेवारी -

उदगीर येथील रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आले असुन ८ फेब्रुवारी रोजी शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माध्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवुन सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती रंगकर्मी प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बिभीषण मद्देवाड यांनी दिली आहे.

यात पत्रकारीतेतील योगदानाबदल विनायक चाकुरे, एजाज शेख, विजयकुमार बोरफळे, सतिश टोणगे कळंब, संजय पाटील चाकुर, गणेश होळे लातूर, शिवशंकर टाक वडवळ नागनाथ ता.चाकुर, विजय देशमुख निटुर ता.निलंगा यांना सन्मानचिन्ह, गौरवपत्र देवुन आदर्श पत्रकारीता पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात येणार आहे.

रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, सचिव सिद्धार्थ सूर्यवंशी, उपाध्यक्ष प्रा.भगिरथ सगर, सदस्य नागनाथ गुट्टे, मनोहर लोहारे, ॲड. महेश मळगे, प्रा. रामदास केदार, रसुल पठाण, लक्ष्मण बेंबडे, मारोती भोसले यांनी निवड झाल्याबदल अभिनंदक केले आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
शिरूर अनंतपाळ, दि.४ जानेवारी -

निलंगा येथील मुस्लिम बांधवाच्या इज्तेमासाठी जात असताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयाला धावती भेट दिली. याप्रसंगी महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष तथा प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी स्वागत केले.

शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या विकासासदंर्भात चर्चा केली. शिरूर अनंतपाळ येथील कृषी, उत्पन्न बाजार समिती सध्या डबगाईला आली असल्यामुळे सहकार मंत्री यांनी मदत करून चालू करण्यासाठी येथील व्यापारी व कार्यकर्तानी निवेदन देऊन मदतीची मागणी केली. याप्रसंगी तहसीलदार गोविंद पेदेवाड, पोलीस निरीक्षक विठ्ठलराव दराडे, पो.उप.नि. गजानान अनासपुरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष विठ्ठलराव पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अतुल माने पाटील, शहराध्यक्ष अनिल देवंगरे, प्रदेश सचिव तुषार मादळे, ओबीसी जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानोबा मोगले, राष्ट्रवादीचे तालुका कार्याध्यक्ष अब्दुल अजीज मुल्ला, महेताब शेख, सुचित लासुने, माधव संभाळे, बाळाभाऊ शिवने, विवेक घारोळे चंद्रकांत कांबळे, औदुंबर शिंदाळकर, केदार लोंढे, आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे शिरूर अनंतपाळ नगरीत अगमन होताच फटाक्याची अतिषबाजी करून त्यांना पुस्तक देऊन जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला.

पांडुरंग सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन पंधरवडाची विविध कार्यक्रमांनी सुरुवात

तभा वृत्तसेवा
रेणापूर, दि.४ जानेवारी -

रेणापूर तालुक्यातील दवनगाव येथे पांडुरंग सार्वजनिक वाचनालयात शनिवार दि.४ जानेवारी रोजी ग्रंथप्रदर्शन, पुस्तकांचे सामुहिक वाचन, पुस्तक परिक्षण स्पर्धा व विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दवनगाव येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन पंधरवडा ची सुरुवात महिला शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पत्रकार शिवाजी यमते यांनी केली. सर्वप्रथम नागरगोजे प्रदुम्न यांनी सूत्रसंचालन करत सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यानंतर वाचकांचे सामूहिक वाचन आणि मुलांचे प्रकट वाचन घेण्यात आले. या कार्यक्रमाला जि.प.प्रा शाळा दवनगाव येथिल विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पत्रकार शिवाजी यमते यांनी वाचन का करावे वाचनाची गरज, महत्व या बाबत सविस्तर माहिती सांगितली. दवनगाव येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.व्ही. बंडेवाड यांनी कार्यक्रम प्रसंगी बोलताना वाचनाचे महत्त्व तसेच पुस्तकांचे जीवनातील महत्त्व काय असते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर पुस्तकांची संगत धरावी लागेल जो पुस्तकांच्या संगतीत राहतो तो आयुष्यात यशस्वी होतो असे मत पांडुरंग सार्वजनिक वाचनालय दवनगांव चे ग्रंथपाल नागनाथ नागरगोजे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

याप्रसगी या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटक पत्रकार शिवाजी यमते ,मुख्याध्यापक एस.व्ही. बंडेवाड, शिंदे व्ही.टी, ठोंबरे व्ही.आर, शालेय समितीचे अध्यक्ष राहुल नागरगोजे, सुग्रीव नागरगोजे, मस्के राजकुमार, नागरगोजे प्रदुम्न आदि मान्यवर, दवनगाव ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार पांडुरंग सार्वजनिक वाचनालय दवनगांवचे ग्रंथपाल नागनाथ नागरगोजे यांनी मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

धनगर समाजाची चाकूर येथे ५ जानेवारीला बैठक

समाज बांधवांनी उपस्थित रहावे : लहुजी शेवाळे

तभा वृत्तसेवा
चाकूर, दि.४ जानेवारी -

लातूर जिल्ह्यातील धनगर सम ाज बांधवांची आरक्षण चळवळीत काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक दि.५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवशक्ती बॅटरी नांदेड रोड चाकूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदरील बैठकीला जय म ल्हार सेनेचे प्रमुख लहुजी शेवाळे जय मल्हार अहिल्या सेनेच्या प्रमुख रंजना बोरसे, ज्येष्ठ नेते राम कांबळे, मराठवाडा प्रमुख माणिकराव राऊत, सूर्यकांत भोसले, माधवराव साळुंखे, शंकरराव शेळके, दिनकरराव बडूरे, प्रा. श्रीधर पाटील, हरिभाऊ काळे, माणिकराव आलूरे, प्राचार्य एल.टी. केसाळे, टिकोरे, शिवाजीराव शिंदे, लहुजी कोरे आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

तरी लातूर जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व मान्यवरांनी उपस्थित रहाण्याचे जय मल्हार सेनेचे प्रमुख लहुजी शेवाळे यांनी विनंती केली आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने या बैठकीला हजर राहावे असे आवाहन ओम प्रकाश नंदगावे, पांडुरंग लोकरे, नारायण राजुरे, अजित खंदारे, सुभाष काळे, संतोष गडदे, श्रीकांत हाके, तेजराव खटके, श्रीकृष्ण सुरवसे, आनंद देवकते, चंद्रकांत एनकफळे, म हेश भिंगोले, गोपाल म्हेत्रे, सुरेश शेवाळे, नारायण वगरे, राहुल किडमीडे, अजय मदने, आकाश कुकर, शिवाजी आलुरे, नारायण धायगुड़े, बालु दिवटे यांच्यासह आदीनी केले आहे.

अहमदपूर शहरात ठिकठिकाणी सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
अहमदपूर, दि.४ जानेवारी -

पारतंत्र्यात सामाजिक गुलामगिरी झुगारून मुलींना शिक्षनाचा हक्क देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची जयंती अहम दपूर परिसरात विविध ठिकाणी साजरी करण्यात आली.

संत ज्ञानेश्वर विद्यालय

संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे तर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी वाघमारे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नवनाथ हांडे, माता पालक संघाच्या सहसचिव प्रियंका पारसेवार, सदस्या स्नेहा हांडे सह आदी मान्यवर उपस्थित होते. नवनाथ हांडे व प्रियंका पारसेवार यांच्या वतीने सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील व भाषण स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. मुख्याध्यापक बालाजी वाघमारे,नवनाथ हांडे यांचे मनोगतपर भाषण झाले. आशा रोडगे यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश साबणे यांनी केले. सूत्रसंचालन मीना होनराव यांनी केले तर आभार सुजाता बुरगे यांनी मानले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

गणेश वाघमारे, श्रावण वाघमारे, डी.एस. वाघमारे, राजकुमार वाघम ारे, एन.डी. राठोड, बालाजी दुगाणे, रावसाहेब वाघमारे, हरीश नागमोडे, पंढरी वाघमारे, ज्ञानोबा गायकवाड, हिरामणजी, धसवाडीकर यांच्याकडूनही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. डी.एस. वाघमारे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर सविस्तर माहिती दिली.

यशवंत विद्यालय...

अनादी काळापासून स्त्रियांना आदिशक्ती मानले जाते. स्त्री ही सृजनशील आणि नवनिर्मितीची प्रणेती आहे म्हणून समाजाने सर्व स्तरातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श घेऊन जीवन दीपस्तंभ प्रमाणे बनवावे असे प्रतिपादन शांतिनिकेतन सहकारी पतसंस्थेच्या माजी अध्यक्षा पुष्पाताई लोहारे यांनी केले. त्या यशवंत विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे हे होते. अतिथी म्हणून उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी, खयूम शेख, वर्षा माळी, यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. जयंतीचे अवचित्य साधून पुष्पाताई लोहारे यांच्या वतीने शाळेला चार फूट उंचीची समयी भेट देण्यात आली.

सूत्रसंचालन माही कुलकर्णी, समिक्षा मिटकरी, आरपिता केंद्रे यांनी तर आभार वैष्णवी बनसोडे यांनी मांनले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कपिल बिराजदार, राजेश कजेवाड, श्रीधर लोहारे, बालाजी सोनटक्के शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

किलीबल नॅशनल स्कूल...

येथील किलबिल नॅशनल स्कूल येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उप प्राचार्य धर्मसिंग यांचे हस्ते सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज्ञानोबा भोसले यांनी विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन केले. १८ व्या शतकात महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे मोठे योगदान आहे. चूल आणि मूल या पारंपरिक चौकटीतून महिलांना बाहेर काढून शिक्षण दिल्याने महिला आज पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजात वावरत आहेत.

महात्मा गांधी महाविद्यालय...

विचार विकास मंडळ द्वारा संचलित महात्मा गांधी महाविद्यालयात भारतीय स्त्री शिक्षणाच्या प्रनेत्या, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस विचार विकास मंडळाचे सहसचिव मा सुरेशराव देशमुख साहेब यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच म हाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.आर. शेळके यांनीही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा स्टाफ सेक्रेटरी प्रो.डॉ.अनिल कांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ जे.पी. कुलकर्णी, पर्यवेक्षक डॉ. सुनील साडेगावकर, कार्यालय अधीक्षक डी. के. गाजरे, रसानशास्त्र विभाग प्रमुख तथा खटउ समन्वयक डॉ. अनिलकुमार जाधव, हिंदी विभाग प्रमुख डॉ. राजश्री भामरे, डॉ. राजश्री जाधव भूगोल विभाग प्रमुख, प्रो.डॉ. नितीन देशमुख, लोकप्रशासन विभाग प्रमुख तथा सोशल मीडिया प्रमुख प्रा.डॉ. दिलीप बंजारा तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले.

पैठण येथे ड्रेनेज सोबतच पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन

अनोख्या कामाची पैठणला चर्चा.

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ :- कोट्यवधी रुपये खर्चून पैठण शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी सुरू असलेल्या पाईपलाईनचे निकृष्ट दर्जाचे होत असून अनेकांनी या कामाची तक्रार नगर परिषदेकडे केली आहे. असे असतांना शहरातील नाथविहार,रामनगर भागात पाणी पुरवठा करणारी नवीन पाईपलाईन तसेच ड्रेनेज लाईनचे चिटकून काम उरकले जात असल्याने या अनोख्या कामाची पैठणला चर्चा होत आहे.

श्रीमंतांच्या दावनीला बांधलेल्या पाणीपुरवठा करणाऱ्या या नवीन पाईपलाईनचे काम संशयास्पद असून शहरात अनेक भागात सध्या या पाईपलाईनचे काम अपूर्ण असतांना पन्नालाल बाबा नगरात एका पेट्रोल किंगच्या दबावात निर्मूष्य प्लाटिंग मध्ये सुद्धा नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम उरकले जात आहे. जवळच असलेल्या तहसील कार्यालय मागील महावितरण समोरून नाथविहार,रामनगर भागात रस्त्याच्या शेजारून ड्रेनेज भरणा लाईन तसेच पाणी पुरवठा करणाऱ्या नवीन पाईपलाईनचे चिटकून काम होत असल्याने भविष्यात याठिकाणी मोठी समस्या जाणवणार आहे.सदरील पाईपलाईनचे काम प्रशासनाला खुश करून मनमर्जी पध्दतीने करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.

मलमूत्र नालीची घाण ड्रेनेज लाईनला चिटकून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन काम बघून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पाईपलाईन काम करणाऱ्या ठेकेदाराला अशी संकल्पना कोणत्या अभियंत्यानी दिली असावी याबद्दल त्यांचा नागरिकांकडून सत्कार होणार आहे. पावसाळ्यात सांडपाणी वाहण्यास अडथळा व नालेच बूजवल्याने या भागात कमरे एवढे घाण पाणी साचून नागरिकांचे जगणे अवघड होतं असतांना ड्रेनेजलाईन व पाणी पुरवठा करणारी पाईपलाईनचे काम चिटकून झाल्याने भविष्यात याठिकाणी मोठी समस्या निर्माण होणार आहे.

संघ हीच जीवनगाथा



अलक (४)

देशभक्ती

केशवचे बालपणीचे शिक्षण नागपूरला महाल जवळील Neill city high-school मध्ये झाले. इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाला १८९७ साली साठ वर्षे पूर्ण झाली, म्हणून त्यांच्या शाळेत राजनिष्ठा प्रकट करणारा समारंभ झाला. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. पण केशव नी तो खाऊ घरी आल्यावर कचर्यात फेकला व मोठ्या भावाला म्हणाला त्या खाऊ वरील दास्याची मुद्रा मी कचऱ्यात फेकली. त्या काळात केशव व त्याचे सवंगडी शिवाजी महाराज व त्यांचा भगवा ध्वज याकडे आकर्षित होत असत. नागपुरातील सीताबर्डीच्या किल्ल्यावर युनियनजॅक दिवसभर फडकतांना पाहून केशवला संताप येत असे, यातून त्याची उदात्त देशभक्तीच घरातल्या वडीलधाऱ्यांना जाणवत होती. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

अभ्यासाबरोबरच जीवनात आध्यात्मिक ज्ञानही असणे आवश्यक ----उपआयुक्त युवराज पडियाल.

तभा वृत्तसेवा बिडकीन दि ४ जानेवारी अभ्यासाबरोबरच जीवनात यशस्वी होण्यासाठी अध्यात्मिक ज्ञानही आवश्यक आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेऊन पुढे जाण्यासाठी प्रयत्नशाली राहीले पाहिजे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडियाल यांनी केले, ते शिरुरकासार तालुक्यातील ब्रह्मनाथ येळंब येथील सेवाश्रम या संस्थेत आयोजित एका कार्यक्रमात मार्गदर्शन प्रसंगी बोलत होते, पार्किन्स या कंपनीमार्फत जॉब ऑफ लिव्हिंग या उपक्रमांतर्गत वंचित घटकातील तमाशा कलावंतांच्या मुलांसाठी काम करणाऱ्या सेवाश्रम या संस्थेतील मुलांना गरजू वस्तूंचे वाटप करण्यात आले, या कार्यक्रमास बीड जिल्हा जात पडताळणी समिती उपायुक्त संगीत मकरंद यांच्यासह कंपनीच्या स्वाती कुमार,रोड इंडियाचे प्रोजेक्ट मॅनेजर अनिल गायकवाड, यांच्यासह सेवा श्रमच्या संचालिका मयूरी राजहंस, सुरेश राजहंस,व संस्थेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थिती

आ. अब्दुल सत्तार याच्या हस्ते गुरुमाऊली गोशाळा येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन

सिल्लोड (प्रतिनिधी) दि. ४, उंडणगाव ता. सिल्लोड येथील राजेंद्र कुमार रामगोपाल खंडेलवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित गुरुमाऊली गोशाळा येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. गायींसाठी गोठा, व इतर व्यवस्थापण या कामासाठी आ. अब्दुल सत्तार यांनी २० लाख रुपयांचे शासकीय अनुदान मिळवून दिले.

गोशाळा चालविणे हा स्तुत्य उपक्रम असून गोशाळा चालवीत असतांना गायींचे योग्य संगोपन झाले पाहिजे असे मत आ. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले. गायींपासून दूध, तसेच शेणापासून बायोगॅस, खत व्यवस्थापन केल्या जाते. त्यामुळे गोशाळा अतिशय उपयुक्त मानल्या जाते. राज्यात देशी गायींच्या संख्येत वाढ करून त्यांचे संवर्धन करण्याच्या

दृष्टीने गायींच्या पालनपोषणासाठी पशुपालकांना प्रेरित करण्यासाठी शासन अनुदान देते असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

यावेळी गुरुमाऊली गोशाळेचे अध्यक्ष सारंग खंडेलवाल यांनी प्रास्ताविक केले. अमोल नाईक यांनी सूत्रसंचालन तर शेवटी सचिव ललित खंडेलवाल यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी डॉ. तानाजी सनान्से, राजाराम पाडळे, मोतीराम पाडळे ,सरपंच नर्सिंग वाघ ,भगवान भोरकडे ,पंकज जयस्वाल ,विजय नाईक ,सयाजी वाघ , प्रकाश बोराडे, अरुण पंडित, ज्ञानेश्वर बोराडे ,बाळू नरवडे ,विलास सावळे,जगन पाटील, दत्तू सावळे, कैलास वाघ, गजानन बोराडे ,अशोक साळवे ,लक्ष्मण पाटील, रामेश्वर लांडगे ,राहुल शेठ, गणेश इंगळे, दिलीप धनवई, संजय धनवई ,निलेश जयस्वाल, हनुमंता वाघ ,रामू सुरडकर ,दीपक चौथे, पवन खंडेलवाल, विलास पाटील, सय्यद जब्बार, सय्यद नासिर, सुरेश गवळी ,सरताज शेख , मोहसीन शेख आदिंसह परिसरातील शेतकरी गावकरी उपस्थित होते.

पैठणचा वीज पुरवठा वारंवार खंडित

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ :- पैठण शहराला विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईनला बिघाड तसेच मेंटेनन्ससाठी कामासाठी वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असून यामुळे वीज ग्राहक हैराण झाले आहेत.

आठवडाभरापासून दिवसा तसेच रात्री परिसरात दररोज वीज पुरवठा खंडित होत असून. त्याचबरोबर, कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने नागरिकांना मनस्ताप होत आहे.शहरातील सर्वच भागात वारंवार विद्युत पुरवठा खंडित झाल्याने घरातील उपकरणे बिघडत आहे आणि व्यावसायिक पूर्ण त्रस्त झाले आहेत. अनेक व्यावसायिकांना याचा त्रास होत आहे. तसेच पिकांना वीजेअभावी पाणी देता येत नसल्याने पिकेही जळण्याच्या मार्गावर आहेत. याबाबत महावितरणचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता मेन लाईन मध्ये बिघाड तसेच वेगवेगळ्या भागात मेंटेनन्सचे काम सुरू असल्याने वीज पुरवठा करण्यास व्यत्यय येत असल्याचे त्यांनी सांगितले.

सोयगाव दि.४ जानेवारी : आळंदी येथे श्रीराम मंदिर न्यास अयोध्या कोषाध्यक्ष प.पु गोविंददेवगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संत कृतज्ञता संवाद सोहळा दि.३ शुक्रवार रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.यात सोयगाव येथील अगस्ती महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या ह.भ.प.जितेंद्र महाराज पंडित,ह.भ.प.सुधन्वा महाराज केणेकर व ह.भ.प.निवृत्ती महाराज मोहने या तिघांना सन्मानित करण्यात आले.

फर्दापूर येथे पोलिस दिनानिमित्त शाळेचे विद्यार्थी यांना मागदर्शन

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ४ पोलीस दल स्थापना दिनाचे औचित्य साधत माणिकराव पालोदकर विद्यालयातील शालेय विद्यार्थ्यांनी शुक्रवार दि.३ फर्दापूर पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस स्टेशनच्या कार्यपद्धतीची माहिती जाणून घेतली.यावेळी पोलिसांच्या कर्तव्याप्रती विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता,कुतूहल आणि आश्चर्यही पाहायला मिळाले.

यावेळी फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक

प्रफुल्ल साबळे यांनी शालेय विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध शस्त्रे,हत्यार,सायबर क्राईम,महिला सुरक्षा,अंमली पदार्थाच्या सेवनाचे दुष्परिणाम,गुड टच बॅड टच,वाहतूक सुरक्षा व सुरक्षा हेल्पलाईन याविषयी माहिती दिली व त्यांच्या शंकांचे निरसन केले. या दरम्यान,पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे यांनी पोलीस स्टेशनचा कार्यभार कश्या पद्धतीने चालतो,गुन्हा कसा दाखल केला जातो,गुन्ह्यांचे प्रकार व उपलब्ध शस्त्रे दाखवून त्यांची नावे सांगितली.यावेळी विद्यार्थ्यांना शस्त्रे हाताळण्याची संधी मिळाली.

यावेळी पो.कॉ.आनंद पगारे,कविता चाथे,कल्पना चाथे,मुख्याध्यापक के.आर. पाटील,एच.डब्ल्यू काकडे,वाय. एन.सोन्ने,श्रीमती भोंबे,श्रीमती. पाटील,एच.डब्ल्यू काकडे,वाय. एन.सोन्ने,श्रीमती भोंबे,श्रीमती. दौड उपस्थित होते.विद्यालयाच्या वतीने विद्यार्थिनी अस्मिता मंगेश तायडे हिने आभार मानले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

बिडकीन दि ४ जानेवारी : पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे पहिल्या स्त्री शिक्षिका, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर चाटुपळे, बाबासाहेब सोकटकर, प्रमुख वक्ते अनिल कांबळे, तुषार अहिरे, मनिषा सोनवणे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी संगीत शिक्षिका संध्या शिंदे, सुजाता तोष्णीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्री वंदना सादर केली. यावेळी माधवी चव्हाण, श्रावणी बांडे, गौरी चौधरी,सिद्धिका मालुसरे यांनी आम्ही सावित्रीच्या लेकी हे मनोगत सादर केले. सुवर्णा जाधव,मयुरी काव्हरे, ज्ञानेश्वरी धाडगे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या ओव्या सादर केल्या तर युवराज चौहान,मशिरा कुरेशी, आनंदी धाडगे, यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भाषणे केली. प्रमुख वक्ते अनिल कांबळे, तुषार अहिरे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनया बोरुडे आभारप्रदर्शन युवराज चौहान यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयश्री महाजन, सुजाता तोष्णीवाल सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

एमजीएम आणि आयसीएसआय यांच्यामध्ये सामंजस्य करार संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया, नवी दिल्ली (आयसीएसआय) यांच्यामध्ये एमजीएम विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाच्यावतीने छत्रपती संभाजीनगर चाप्टरच्या अध्यक्षा कोमल मुथा तर एमजीएमकडून कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध संस्थांशी एमजीएम विद्यापीठ सामंजस्य करार करीत आले आहे.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, उपकुलसचिव

प्रा.डॉ.परमिंदर कौर, संचालिका डॉ.झरताब अंसारी, प्रा.रिना मानधनी, प्राध्यापक व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ.विलास सपकाळ म्हणाले, कार्पोरेट क्षेत्र आणि शैक्षणिक क्षेत्राने एकत्र येणे ही काळाची गरज असून या माध्यमातून विद्यार्थ्यांना कार्पोरेट क्षेत्राची समकालीन काळातील गरज समजण्यास मदत होते. दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया आपला दर्जा जपत सातत्यपूर्ण नावीन्यपूर्ण प्रयोग राबवित कार्यरत आहे. आपापल्या क्षेत्रामध्ये उत्तम काम करीत असलेल्या दोन संस्था आज एकत्र आल्यामुळे याचा फायदा दोघांनाही होणार आहे. विशेषत: विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेत असताना या सामंजस्य कराराचा अधिक लाभ होणार आहे.

एमजीएम विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पूर्णपणे अंमलबजावणी केलेली असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना बहुविद्याशाखीय शिक्षण आपण उपलब्ध करून दिले आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण शिक्षण शिकता येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढून ज्ञानात भर पडणार आहे. कार्पोरेट विश्वात सुरू असलेले विविध प्रयोग त्यांना प्रत्यक्षपणे पाहता येणार असून ते यातून नावीन्यपूर्ण कल्पनांची निर्मिती करतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी व्यक्त केला.

कुलसचिव डॉ. गाडेकर यावेळी बोलताना म्हणाले, एमजीएम विद्यापीठाने आत्ताच पाच वर्ष पूर्ण करून सहाव्या वर्षात पदार्पण केले आहे. एमजीएम गेल्या चार दशकांपासून विविध क्षेत्रात कार्य करीत आलेले आहे. एमजीएम विद्यापीठ विविध क्षेत्रातील संस्थांशी सामंजस्य करार करून विद्यार्थी हिताचे वेगगेगळे उपक्रम राबवित आले आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना संधीचे आणखी एक दालन खुले झाले आहे.

दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया आपली उच्च गुणवत्ता आणि दर्जा जपत कार्यरत आहे. आज या सामंजस्य करारामुळे आम्हाला एमजीएम विद्यापीठाशी जोडता आले याचा मनापासून आनंद आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आंतरवासिता करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच या माध्यमातून कॉर्पोरेट क्षेत्रातील भावी व्यावसायिक तयार करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल पडलेले असल्याचे प्रतिपादन आयसीएसआयच्या अध्यक्षा कोमल मुथा यांनी यावेळी केले.

सामंजस्य कराराविषयी :

एमजीएम विद्यापीठ आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया या दोन संस्थांमध्ये झालेल्या या सामंजस्य कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांना याचा फायदा होणार आहे. आंतरवासिता, प्रशिक्षण, प्रकल्प भेट, संशोधन, कार्यशाळा, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आदि बाबी या माध्यमातून होणार आहेत.

लेखक आणि वाचकाचे नाते अतुट : डॉ. छाया महाजन

छत्रपती संभाजीनगर : आपल्याला आवडेल ते वाचा पण नक्की वाचा,अवांतर वाचनाने ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात,वाचनातून प्रगल्भता येवून जीवनचा विकास होत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.छाया महाजन यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात लेखक व विदयार्थी वाचन संवाद कार्यक्रम दि.०३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमप्रसंगी विषेश अतिथी म्हणून डॉ.महाजन बोलत होत्या.आजकालच्या धकाधकीच्या जीवनात वाचनादवारे ताणतणावावर सहज

मात करणे शक्य असुन आनंदी व परिपुर्ण जगण्यासाठी प्रत्येकाने वाचायला हवे असेही डॉ.महाजन म्हणाल्या.

सदर कार्यक्रमास मॉडर्न संगणक शास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ रामेश्वर पवार, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे ,जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांची उपस्थिती होते.

आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वाचनाने निर्णय कौशल्ये वाढीस लागुन निर्णय क्षमता प्राप्त होत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी केले. यावेळी उपस्थित विदयार्थी व वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. महाजन यांनी तपशीलवार व दिलखुलास उत्तरे दिली. शासकीय विभागीय ग्रंथालय, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय आणि मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविदयालय व विक्रमशीला कॉलेज ऑफ फैशन डिजाईन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विदयमाने वाचन पंधरवड्यानिमित्त वाचन संस्कृतीशी निगडीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्यास विदयार्थी, वाचक व परीसरातील नागरीकांचा मोठयाप्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी केले. सुत्रसंचलन अनिल बाविस्कर तर आभार प्रदर्शन ग्रंथालय निरिक्षक आवजी गलांडे यांनी मानले. वाचन पंधरवडयानिमित्त ग्रंथालयाची सभासद नोंदणी मोहिम देखील राबविण्यात येत असुन ईच्छुकांनी ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील ग्रंथसंपदेचा लाभ घेण्याचे आवाहन श्री सुनील हुसे यांनी केले आहे.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय सिल्लोड येथे पोलीस रेजिंग डे निमित्त विद्यार्थ्यांचे उद्बोधन

सिल्लोड प्रतिनिधी : दि.४ जानेवारी रोजी पोलीस रेजिंग सप्ताहानिमित्तश्री छत्रपती शिवाजी विद्यालय सिल्लोड येथे विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना गुड टच बॅड टच,महिलांवरील अत्याचार,बालविवाह, बालकामगार,रस्ते सुरक्षा,अशा विविध मुद्याद्वारे विद्यार्थ्यांचे उद्बोधन करताना शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार,श्रीमती दिपाली चिकटे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले.याप्रसंगी घडणाऱ्या विविध घटनांच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून ठरविलेल्या फोन नंबरची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली त्यामाधे

सायबर फ्रौड १९३०, चाइल्ड हेल्पलाईन १०९८, टोलफ्री

हेल्पलाईन ११२, महिला हेल्पलाईन १०९१, आदींचा समावेश होतो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संजीव दौड हे होते,याप्रसंगी शहर पोलीस स्टेशनचे रामानंद बुधवंत, भूषण चौधरी तसेच विद्यालयाचे शिक्षक रमेश सोनवणे, विष्णू फरकाडे,निशांत म्हस्के,कृष्णा सपाटे,श्रीमती संगीता तायडे,मधुकर मगर, लक्ष्मण कोलोड,पांडुरंग डापके,संजय पाखरे, नरेशसिंग राजपूत,रमेश परदेशी,कृष्णा भांडारे,श्रीमती संगीता काळे,गणेश काळे,गजानन दौड, अमोल तारू,अंगद काळे,पंकज सावंत यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश चव्हाण यांनी केले.

अग्रलेख...

जम्मू-काश्मीर आणि व्याप्त काश्मीर

भारताचे नंदनवन म्हणून कधीकाळी ओळखल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरचा खऱ्या अर्थाने कोणी सत्यानाश केला असेल तर तो देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी. खरं म्हणजे जम्मू-काश्मीर हे देशातील अन्य राज्यांसारखेच एक राज्य. पण दिल्लीतील आणि त्या राज्यातील राज्यकर्त्यांच्या भूमिकेमुळे जम्मू-काश्मीर हे भारतातील एक राज्य असल्याचे तेथील जनतेला तसेच देशाच्या अन्य भागातील जनतेलाही कधी जाणवले आहे. 'सारी दुनिया एक तरफ जोरू का भाई एक तरफ' असे म्हटले जाते; तशीच वागणूक आपल्या देशाच्या तत्कालीन नेतृत्वाची होती. जम्मू-काश्मीर नेहरू-गांधी घराण्यातील नेत्यांसाठी 'जोरू का भाई'सारखे होते. काश्मीरच्या मुद्यावरून देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमतेसोबत राज्यकर्त्यांनी नेहमीच तडजोड केली. जम्मू-काश्मीरची एकूणच वागणूक नेहमी स्वतंत्र देशासारखी होती. आपण भारतासोबत आहोत, हे आपले भारतावर उपकार आहेत, आपल्याला भारताची गरज नाही, तर भारताला आपली गरज असल्याचे तेथील राज्यकर्त्यांच्या वागणुकीवरून पदोपदी जाणवत होते. तेथील राज्यकर्त्यांचे भारतापेक्षा पाकिस्तानवर जास्त प्रेम होते. म्हणजे मंगळसूत्र भारताच्या नावाचे, पण शृंगार पाकिस्तानसोबत अशी व्यभिचारी भूमिका जम्मू-काश्मिरातील राज्यकर्त्यांची नेहमीच राहिली. जम्मू-काश्मीरमधील राज्यकर्त्यांच्या या भूमिकेला काँग्रेसच्या विशेषत: नेहरू-गांधी घराण्यातील नेत्यांची फूस होती. घरात एखाद्या मुलाचे अनावश्यक लाड व्हावे, तसेच जम्मू-काश्मीरचे लाड देशातील राज्यकर्त्यांनी केले. जम्मू-काश्मीरसोबत भारतात विलीन झालेली अन्य संस्थाने दुधात साखर विरघळावी, तसे समरस आणि एकजीव झाले. पण जम्मू-काश्मीरची जखम स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच अश्वत्थाम्याच्या कपाळावरील जखमेसारखी सतत भळभळत राहिली. जम्मू-काश्मीरच्या विघटनवादी समस्येचे मूळ त्या राज्याला दिलेल्या ३७० कलमात आहे. देशातील अन्य कोणत्याही राज्याला असा दर्जा मिळाला नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जम्मू-काश्मीरचे भारतात विलीनीकरण करताना कारण नसताना जम्मू-काश्मीरला ३७० कलमाचे सुरक्षाकवच देण्यात आले. त्यावेळी पंडित नेहरूंनी ३७० कलमाचे बुजगावणे उभे केले नसते, तर जम्मू-काश्मीर आणि तेथील राज्यकर्ते उन्मत्त झाले नसते. 'आधीच मर्कट त्यात मद्य प्याला' अशी त्यांची स्थिती झाली नसती. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम निष्प्रभ करण्याचा ऐतिहासिक निर्णय मोदी सरकारने घेतल्यानंतर तेथे आश्वासक आणि आल्हाददायक असा नव्या युगाचा सूर्योदय झाला. जी हिंमत देशातील अन्य राज्यकर्ते दाखवू शकले नाही, ती हिंमत ५६ इंच छातीवाल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दाखवली.

जम्मू-काश्मीरचा खरा इतिहास आजपर्यंत देशासमोर आला नाही. तो आणण्याचे काम राष्ट्रीय पुस्तक न्यासाने नुकतेच केले. जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या इतिहासाचा शास्त्रयुद्ध आढावा एका अभ्यासपूर्ण ग्रंथातून घेण्यात आला. या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी, आतापर्यंत जे गमावले ते परत मिळविण्याचा संकल्प सोडला आहे. अमित शाह यांनी व्याप्त काश्मीरचा उल्लेख केला नसला, तरी त्यांच्या मनात तेच असेल, अशी देशवासीयांची खात्री आहे. पाकिस्तान काश्मीरवर दावाच कसा करू शकतो, हा मोठा गहन प्रश्न आहे. मुळात पाकिस्तानची निर्मितीच भारताच्या फाळणीतून झाली. त्यामुळे पाकिस्तानने काश्मीरवर दावा करणे, हे कधीच मान्य करता येत नाही. तर्कसंगत तर ते कधीच नव्हते. व्याप्त काश्मीर ही अशीच संकल्पना आहे. हे म्हणजे भाडेकरूने घरावर कब्जा करण्यासारखे आहे. व्याप्त काश्मीरच नाही तर संपूर्ण काश्मीर हा भारताचा भाग होता, भारताचा भाग आहे आणि यावत्चंद्रदिवाकरो भारताचा भाग राहणार आहे. तो कोणीही भारतापासून तोडू शकत नाही, हिरावून घेऊ शकत नाही. एखाद्या तान्ह्या मुलाला ज्याप्रमाणे जगातील कोणतीही शक्ती त्याच्या आईपासून तोडू शकत नाही, तसे काश्मीरला पाकिस्तानच काय पण जगातील कोणतीही शक्ती आणि महाशक्ती भारतापासून दूर करू शकणार नाही. पाकिस्तानच काय, जगातील सर्व मुस्लिम देश एकत्र आले तरी ते काश्मीर भारतापासून हिसकावून घेऊ शकत नाही. कारण भारताचे नेतृत्व देशातील दुसऱ्या पोलादी पुरुषाच्या म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात आहे. सरदार वल्लभभाई पटेल हे देशातील पहिले पोलादी पुरुष आहेत. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग खऱ्या अर्थाने सरदार होते, पण त्यांची वागणूक सरदार शब्दाला शोभणारी कधीच राहिली नाही. याउलट मूळ गुजराती असलेले नरेंद्र मोदी यांना त्यांच्या कणखर निर्णयांनी सरदार संबोधायला हरकत नाही. सुरुवातीलाच जम्मू-काश्मीरचा सत्यानाश पंडित नेहरू यांनी केला, असा उल्लेख आहे. जम्मू-काश्मीरचा मुद्दा नेहरूंनी संयुक्त राष्ट्रात नेत आपल्या नाही तर देशाच्या पायावर दगड पाडून घेतला. हा दगड नेहरूंच्या पायावर पडला असता तरी देशातील लोकांना त्याचे फारसे वाईट वाटले नसते. पण तो देशाच्या पायावर पडल्यामुळे त्याच्या वेदना दीर्घकाळ देशाला सहन कराव्या लागल्या. देशाचे शेवटचे व्हॉईसराय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी असा दिवाळखोरीचा सल्ला नेहरूंना दिला आणि बुद्धिभ्रष्ट नेहरूंनी तो डोळे मिटून मान्य केला. नेहरूंचे डोळे त्यावेळी कुणावर होते, याची सभ्यांनी चर्चा करण्याचे कारण नाही. पण नेहरूंच्या या निर्णयाची किंमत देशाला आताआतापर्यंत चुकवावी लागली.

पाकिस्तानने जम्मू-काश्मीरवर आक्रमण करणे ही त्या देशाची पहिली चूक आणि हा मुद्दा संयुक्त राष्ट्रात नेणे ही नेहरूंची दुसरी चूक म्हणायला पाहिजे. दोन देशांतील वाद हा संयुक्त राष्ट्रात न्यायचा असतो, आपल्या देशातील एखाद्या राज्याशी संबंधित वाद हा संयुक्त राष्ट्रात न्यायचा नसतो. तो एकतर पोलिस वा लष्करी ताकदीवर तसेच राजकीय मुत्सद्देगिरीने सोडवायचा असतो, पण याचे भान तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या नेहरूंना राहिले नाही. संयुक्त राष्ट्राच्या देखरेखीखाली काश्मीरमध्ये जनमत संग्रह करण्याची सूचनाही माऊंटबॅटन यांनी केली होती. सुदैवाने आपण आतापर्यंत असा जनमत संग्रह केला नाही, हे जम्मू-काश्मीरच्याच नाही तर देशातील जनतेचेही भाग्य म्हटले पाहिजे. तुम्हाला भारतात राहायचे की पाकिस्तानात अशी विचारणा यातून करण्यात येणार होती. असा जनमत संग्रह म्हणजे माकडाच्या हातात कोलित देणे होते. ३७० कलमाने जम्मू-काश्मीरला भारतापासून पूर्णपणे तोडले होते. जम्मू-काश्मीरचा झेंडा वेगळा होता, घटना वेगळी होती आणि तेथील शासकीय प्रमुखाला मुख्यमंत्री नाही तर पंतप्रधान असे संबोधले जात होते. म्हणजे जम्मू-काश्मीरला नेहरूही देशातील एक राज्य समजत नव्हते, तर स्वतंत्र देश मानत होते, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी 'एक देश में दो विधान, दो निशान और दो प्रधान' विरुद्ध आंदोलन करत आपल्या प्राणाचे बलिदान केले; त्याचाच परिणाम म्हणून नंतर भारताचा तिरंगा जम्मू-काश्मीरचा झेंडा झाला. तेथील घटनेत सुधारणा करण्यात आली आणि पंतप्रधानाला मुख्यमंत्री म्हटले जाऊ लागले. यासाठी देशातील जनतेने डॉ. मुखर्जी यांचे मानावे तेवढे आभार कमी आहे. जम्मू-काश्मीरचा नागरिक हा भारताचा नागरिक होता, पण भारताचा नागरिक जम्मू-काश्मीरचा नागरिक मानला जात नव्हता, त्याला तेथे कोणतेही घटनात्मक अधिकार नव्हते. हा जो इतिहास आहे, त्यावर जम्मू-काश्मीरवर लिहिण्यात आलेल्या नव्या ग्रंथातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. व्याप्त काश्मीर पुन्हा आपल्या काश्मीरला पर्यायाने देशाला जोडले जावे, ही देशवासीयांची मनापासूनची इच्छा आहे. मोदी सरकारने सत्तेत आल्यावर ३७० कलम ज्या हिमतीने आणि धाडसाने हटवले, त्याच हिमतीने आणि धाडसाने मोदी सरकार व्याप्त काश्मीर एक दिवस आपल्या ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही. अखंड भारताचे जे स्वप्न आपण कधीपासून पाहात आहे, त्याच्या पूर्तीच्या मार्गातील हा पहिला टप्पा समजायला हरकत नाही. 'मोदी है तो मुमकिन है' असे उगीच म्हटले जात नाही.

यंगिस्तान

शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाची आवश्यकता

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

जगाच्या पाठीवर दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तर भागात व्हेनेझुएला नावाचा एक देश आहे. या देशाची लोकसंख्या सुमारे तीन कोटी आहे. मात्र, हा देश गुन्हेगारीमध्ये अव्वल क्रमांकावर आहे. इथे अनेक वर्षांपासून खून, अपहरण, मानवी तस्करी, ड्रग्ज रॅकेट यांसारखे हिंसक गुन्हे सर्रास घडतात. १२ ते १५ वर्षांची लहान मुलं हातात बंदुका घेऊन खून-दरोडे करण्यास प्रवृत्त होतात. इथे पराकोटीचा भ्रष्टाचार होतो. इथलं सरकार आणि न्यायव्यवस्थाही भ्रष्ट आहे. त्यामुळे कुणीही या देशात फिरायला जात नाही. इतकी वाईट परिस्थिती असतानाही १९७५ मध्ये एका देवदूताने गुन्हेगारीत भरडलेल्या या देशाला आशेचा किरण दाखवला. त्या देवदूताचे नाव आहे जोस ॲण्टोनियो ॲब्रू. त्यांनी 'एल सिस्टेमा' नावाचा एक संगीत प्रशिक्षण उपक्रम विकसित केला. 'एल सिस्टेमा' म्हणजे दि सिस्टिम. सामाजिक बदल करण्यासाठी मुलांना, विशेषतः वंचित, मागासलेल्या समाजातील किंवा गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या मुलांना मोफत शास्त्रीय संगीत शिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. एका अंडरग्राऊंड पार्किंग गराजमध्ये या उपक्रमाची सुरुवात झाली. सुरुवातीला केवळ ११ विद्यार्थी आले. २०१५ मध्ये ४०० म्युझिक सेंटर्स आणि ७ लाख बाल व तरुण संगीतकार तयार झाले आहेत. विशेष म्हणजे हा उपक्रम व्हेनेझुएलाच्या सीमा ओलांडून सुमारे ६० देशांमध्ये पोहोचला आहे. 'सामाजिक बदलासाठी संगीत' हे त्यांचं ब्रीदवाक्य आहे. कारण संगीत व इतर कलांमुळे एकता, बंधुता, परस्परांबद्दल आदर वाढू लागतो. आता 'एल सिस्टेमा' एक जागतिक चळवळ होऊ लागली आहे. एल सिस्टेमामुळे व्हेनेझुएलाच्या अनेक मुलांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या मुलांमध्ये आमूलाग्र बदल दिसून आला. ते गुन्हेगारीपासून परावृत्त झाले. मुलांना आत्म-नियंत्रण करता आले, वाईट वर्तणुकीवर ताबा मिळविता आला. ही लक्षणे विशेषतः हिंसाचाराला सामोरे जाणाऱ्या मुलांमध्ये दिसून येतात. 'एल सिस्टेमा' उपक्रमाच्या माध्यमातून मुलांचे कौशल्य विकसित केले जाते, ही कौशल्येच त्यांना गुन्हेगारीपासून दूर ठेवतात.

आपला भारत देश या मानाने खूप समृद्ध आणि सज्जन लोकांचा देश आहे. इथला गुन्हेगारी दर आटोपशीर आहे तसेच आतंकवाद, नक्षलवाद यावर आता सरकार अंकुश ठेवत आहे. पण विचार करा, गुन्हेगारीने होरपळलेल्या देशात असा आमूलाग्र बदल घडू शकतो, तर भारत देशात किती मोठा परिणाम दिसून येईल. तुरुंगात असलेल्या गुन्हेगारांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यात कला हा

विषय महत्त्वाचा आहे. सच्चा कलाकार हा संवेदनशील असतो. त्यात नाट्य कला ही अत्यंत समृद्ध व सर्वसमावेशक आहे. कारण त्यात केवळ अभिनय नसून संगीत, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा असे अनेक घटक सामावलेले आहेत. अनेक वर्षांपासून शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश व्हावा, यासाठी मागणी केली जात आहे. पूर्वी लोक हा विषय गांभीर्याने घेत नव्हते. गेल्या १०-१२ वर्षांत मात्र हळूहळू बदल घडू लागला आहे. सरकारी यंत्रणादेखील याबाबत सकारात्मक दिसत आहे. अनेक पालकांना व शिक्षकांना असे वाटते की, नाटक केल्याने मुलांचे अभ्यासातील लक्ष उडून जाईल. काही पालक म्हणतात की, नाटकात काम केल्यास मूल वाया जाईल; पण तसे नसते. ही प्रतिमा या क्षेत्रातील गलिच्छ लोकांनी निर्माण केली आहे. या क्षेत्रात अनेक सज्जन लोकही आहेत. खरे पाहता नाटकामुळे 'एल सिस्टेमा' प्रमाणे प्रभाव पडतो. मुलं चांगल्या वळणावर येतात. मुलांना अभ्यास चांगल्या प्रकारे कळू लागतो. कारण नाटकात संवाद पाठ करावा लागतो. इतकंच काय, तर समोरच्याचे संवादही लक्षात ठेवावे लागतात. त्यामुळे मुलांची स्मरणशक्ती वाढते, पाठांतराची व आकलनाची क्षमता वाढते. विषय लवकर कळू लागतात. नाटकात संवाद मोठ्याने म्हणावे लागतात. शेवटच्या बाकावर बसलेल्या प्रेक्षकांपर्यंत आपला आवाज पोहोचला पाहिजे. म्हणून बुजरी, हळू आवाजात बोलणारी मुलंही मोठ्याने बोलू लागतात. नाट्य प्रशिक्षणामुळे उच्चार स्पष्ट होतात.

त्याचबरोबर सभाधीटपणा, आत्मविश्वास वाढतो. रंगभूषा, वेशभूषा करावी लागते म्हणून गबाळेपणा जाऊन नीटनेटकेपणा येतो. नेपथ्याच्या माध्यमातून जंगल, रस्ता, घर इत्यादी गोष्टी दाखवल्यामुळे कल्पकता वाढते, मुलांमध्ये स्वतःचे घर सजवण्याची, आपली खोली स्वच्छ ठेवण्याची वृत्ती जागृत होते. नाटक एकट्याचे नसते, तर सगळ्यांनी मिळून करायचे असते. प्रत्येकाला मुख्य भूमिका देता येत नाही. काही सहायक असतात, इतकंच काय, 'बॅक स्टेट आर्टिस्ट'ही असतात, जे अभिनय करत नाहीत, पण नाटकाचा भाग असतात. यामुळे सांघिक भावना वाढते. गटबाजी न करता एकत्र येऊन काम करण्याची वृत्ती वाढू लागते. हे लक्षात घेतले पाहिजे की, शालेय नाट्याचा उद्देश मुलांना केवळ अभिनेता बनवणे असा नसून एक चांगला जबाबदार माणूस बनवणे असा आहे. आजच्या जगात चांगल्या माणसांची नितांत आवश्यकता आहे. ही चांगली माणसं या नाट्य प्रशिक्षणातून घडतील. कारण यातून व्यक्तिमत्त्व विकास घडत असतो. पालकांनो व शिक्षकांनो, लक्षात घ्या, शालेय नाटकांत काम करणारी सगळीच मुलं भविष्यात अभिनय क्षेत्रात जात नाहीत, एखाद-दुसरं मूल या क्षेत्रात करीअर करतं. पण इतर मुलांच्या बाबतीत माणूस होण्याची प्रक्रिया घडते. शालेय नाटकांचे विषय संस्कारक्षम असल्यामुळे मुलांना चांगलं वागण्याचा धडा मिळतो. जसे रस्त्यावर थुंकू नये, कचरा टाकू नये, मोठ्यांशी उलट बोलू नये, अभ्यास व्यवस्थित करावा इ. मात्र तुमचे प्रशिक्षक चांगले असायला हवेत ही अट आहे. पालकांनो, तुमच्या मुलांना चांगली वर्तणूक असलेल्या व्यक्तीकडेच नाट्य प्रशिक्षणाला पाठवा.

शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश केल्याने मुलांमध्ये खरोखरच चांगला बदल दिसून येईल. अत्यंत आगाऊ मुलंसुद्धा जबाबदारीने वागताना मी पाहिली आहेत. मी गेली काही वर्षे नाट्य दिग्दर्शन व प्रशिक्षण देण्याचे काम करतोय. माझ्या स्वतःच्या मुलाला त्याच्या जन्मापासूनच मी हे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली आणि मला खूप सकारात्मक परिणाम दिसून आले. दादागिरी करणारी मुलंही चांगली वागू लागतात, हा माझा अनुभव आहे. त्यांच्या अभ्यासात प्रगती झालेली मी पाहिली आहे. नाट्य प्रशिक्षण म्हणजे माणूस घडवण्याची शाळा आहे, असे आपण समजू शकतो. त्यामुळे शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश केल्याने आपण चांगला माणूस घडवू शकतो. ही मुलं शाळा व महाविद्यालयातून बाहेर पडून जबाबदार नागरिक म्हणून देशाच्या भवितव्यात आपला मोलाचा वाटा देतील. जर 'एल सिस्टेमा'मुळे व्हेनेझुएलासारख्या गुन्हेगारी देशात चांगला परिणाम दिसून येऊ शकतो तर आपला सुजलाम् सुफलाम् भारत देश नाट्य प्रशिक्षणातून माणूस झालेल्या मुलांच्या बळावर जागतिक सत्ता नक्कीच बनेल. म्हणूनच केंद्र व राज्य सरकारने यावर आता गांभीर्याने विचार करायला हवा व शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश करायला हवा.

writerjayeshmestry@gmail.com

वेध

नंदकिशोर काथवटे

स्टील हबच्या दिशेने...

चोर पावलाने गडचिरोली जिल्ह्यात शिरलेल्या माओवादी चळवळीने मागील चार दशकांत या जिल्ह्याला मागासलेपणाच्या काळ्या यादीत पोहोचविले होते. गरिबी, बेकारी, मागासलेपण, अशिक्षितपणा, आरोग्य आणि शिक्षण या समस्यांच्या गर्तेत अडकलेल्या गडचिरोली जिल्ह्याकडे शासन व प्रशासन या साऱ्यांनीच पाठ फिरविली होती. लोहखनिजाचे विपुल साठे, चुनखडी व इतर खनिजे आणि उत्तम प्रतीच्या सागाचे जंगल असलेल्या श्रीमंत गडचिरोली जिल्ह्याच्या वाट्याला गेली कित्येक वर्षे उपेक्षाच आली. येथील माणसे गरीब म्हणून येथील देवसुद्धा गरीबच राहिले. विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खजुराहो काळातील शिल्पकलेने नटलेल्या मार्कंडा नगरीची दुरवस्था केवळ आणि केवळ राजकीय व प्रशासकीय अनास्थेचा बळी ठरले आहे. नक्षल चळवळीमुळे शापित ठरलेल्या या जिल्ह्यात लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड कंपनीने पाय ठेवला आणि जिल्ह्याचे चित्र बदलायला सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने हा शापित जिल्हा आता विकासाची नवी पहाट उजाडत राज्याच्या पटलावर उमटू लागला आहे. परवा नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संपूर्ण दिवसभर गडचिरोलीत होते. जिल्ह्याच्या विकासासाठी काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे भूमिपूजन तर काही प्रकल्पांचे उद्घाटन करून गडचिरोलीची ओळख महाराष्ट्रातील पहिला जिल्हा अशी केल्याची स्पष्टोक्ती त्यांनी केली. जो गडचिरोली जिल्हा मागास म्हणून ओळखला जात होता तोच गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून ओळखला जाईल, नैसर्गिक संपत्तीने श्रीमंत असतानाही गरिबीचे जीणे जगत होता, त्याचा प्रवास आता स्टील हबच्या दिशेने सुरू झाला आहे. भविष्यात मिनी जमशेदपूर म्हणूनही गडचिरोली जिल्हा उदयास येईल, असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. त्रिवेणी अर्थमुव्हर्स कंपनीचे मालक व लॉयड मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांच्या नेतृत्वात ६२०० कोटींची गुंतवणूक गडचिरोली जिल्ह्यात झाली असून, या कंपनीच्या माध्यमातून गडचिरोलीतील हजारो बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांनी प्रभाकरन् यांचा उल्लेख करीत गडचिरोलीच्या परिवर्तनाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा सर्वात पहिले बी. प्रभाकरन् यांचे नाव अधोरेखित केले जाईल, असे म्हटले आहे. सुरजागड येथील लोहखनिज उत्खनन करण्यासोबतच हेडरी येथे कंपनीने निर्माण केलेली सीबीएसई शाळा, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व कोनसरी येथे निर्माण झालेला लोहप्रकल्प गडचिरोली जिल्ह्यासाठी वरदान ठरू लागले आहे. दोन दिवसांपूर्वी लॉयड मेटल्स कंपनीच्या विविध उपक्रमांचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुभारंभ केला. कोनसरी येथे ४०० कोटींच्या डीआरआय प्लांटचे उद्घाटन केले. याशिवाय तीन हजार कोटींचा पेलेट प्लांट आणि स्लरी पाईप लाईन प्रकल्पाचे भूमिपूजन फडणवीसांनी केले. या प्रकल्पामुळे एक हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. याशिवाय हेडरी, एटापल्ली येथे २७०० कोटींचा आयरन ओव्हर ग्रॅडिंग प्लांट व २० कोटी रुपयांचा गारमेंट युनिटही लॉयड मेटल्सच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यात उभारला जात आहे. त्यामुळे येत्या काळात गडचिरोलीच्या विकासाचे चित्र अतिशय वेगळे राहणार असून संपूर्ण राज्याचे लक्ष गडचिरोली जिल्हा वेधून घेत आहे. केवळ गडचिरोली जिल्ह्यातील खनिज उत्खनन करणे हा आपला उद्देश नसून गडचिरोली जिल्ह्यातील बेरोजगारांच्या हाताला काम देणे, गडचिरोलीत रोजगाराच्या संधी निर्माण करणे, येथील मुलांना प्राथमिक व उच्च शिक्षण देणे याशिवाय या येथील लोकांना आरोग्याशी संबंधित अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी सर्वसोयीयुक्त १०० खाटांचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा मानस लॉयड मेटल्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात वर्षांपूर्वी कोनसरी प्रकल्पाच्या पायाभरणीसाठी पुढाकार घेऊन या प्रकल्पाचे भूमिपूजन केले होते आणि सात वर्षांनंतर त्याच जागेवर आता भव्य लोह प्रकल्प उभारला गेला असून त्या प्रकल्पाचे उद्घाटनसुद्धा फडणवीस यांच्याच हस्ते झाले आहे. फडणवीस जे बोलतात ते करतात हे पुन्हा एकदा गडचिरोलीवासीयांनी बघितले आहे. गडचिरोलीच्या विकासासाठी खुद्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लक्ष ठेवून आहेत. त्यांच्या विकासाच्या अजेंड्यावर गडचिरोली जिल्हा अग्रस्थानी आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टि?ट करीत फडणवीसांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. गडचिरोली जिल्हा स्टील हब म्हणून उदयास येत असताना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् व मुख्यमंत्री फडणवीस यांना विसरून चालणार नाही. त्यांच्या पुढाकारानेच गडचिरोलीच्या विकासाची पहाट उजाडेल, यात तिळमात्र शंका नाही.

९९२२९९९५८८

मुंबई वार्तापत्र

साऱ्या अपेक्षा इतरांकडूनच!

नागेश दाचेवार

राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली असली पाहिजे, आरोग्य व्यवस्था चांगली असली पाहिजे, मुली, महिला सुरक्षित असल्या पाहिजेत, राज्यावरचा कर्जाचा डोंगर कमी केला पाहिजे, डागाळलेले, भ्रष्टाचाराचा डाग लागलेले मंत्री मंत्रिमंडळात नसावे, स्वच्छ व पारदर्शक सरकार असलं पाहिजे, संविधानाचं राज्य असलं पाहिजे, गुंडाराज नसावा, राज्याचा विकास झाला पाहिजे, कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे, नुकसानभरपाई दिली पाहिजे, कर्ज मुक्त केलं पाहिजे, वीज माफ केली पाहिजे, सिंचनाचे प्रकल्प मार्गी लावले पाहिजे, दलित, आदिवासींचा विकास केला पाहिजे, प्रशासनावर अंकुश असला पाहिजे, महागाई कमी केली पाहिजे, पेट्रोल, डिझेलचे भाव कमी केले पाहिजे, कर कमी केले पाहिजे अशा एक नव्हे अनेक अपेक्षा उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनी आणि विरोधकांच्या भाजपा सत्तेत असताना त्यांच्याकडून असतात. मुख्यत्वे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असले की अपेक्षांचा डोंगर उभा राहतो. मात्र, १९९५ पासून २०१४ आणि २०१९ मध्ये जेव्हा जेव्हा ठाकरे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सत्तेत होते, या काळात त्यांनी एकाही समस्येचं निराकरण केल्याचा रेकॉर्ड नाही. त्यामुळे आपण स्वतः काही न करता, साऱ्या अपेक्षा इतरांकडूनच करायच्या हा या लोकांचा ठरलेला सेट पॅटर्न आहे.

नवीन वर्षात देवेंद्र फडणवीसांनी आपल्या कार्याची सुरुवात गडचिरोलीपासून केली. सगळे नववर्षाचे जल्लोषात स्वागत करत असताना, फडणवीसांनी मात्र, गडचिरोली जिल्ह्याची नक्षलग्रस्त अशी ओळख आता पुसून काढण्यासाठी पाऊल उचलत, विकास कामांचा धडाका गडचिरोलीपासून सुरू केला. यावेळी अनेक विकास कामांचे भूमिपूजन, उद्घाटन, लोकार्पण करत महाराष्ट्र आता थांबणार नाही असा संदेश त्यांनी दिला. बस्स विरोधकांच्या आणि प्रामुख्यानं उबाठा गटात पोटशूळ उमळले. म्हणतात गडचिरोलीच्या विकासाचा उचललेला विडा तेथील सर्वसामान्य जनता आणि गरीब आदिवासींसाठी उचलला कोणा खाणसम्राटांसाठी नाही, हे दाखवून देण्याची काळजी देवाभाऊंना घ्यावी लागेल, असा खोचक सल्ला उबाठा गटाने दिलाय... १९९५ मध्ये ठाकरेंच्या नेतृत्वात तब्बल साडेचार वर्षे राज्यात दोन मुख्यमंत्री होते. त्यानंतर २०१९ मध्ये उद्धव ठाकरे स्वतः अडीच वर्षे मुख्यमंत्री होते. या एकूण साडेसहा सात वर्षांच्या संपूर्ण कार्यकाळात गडचिरोली जिल्ह्याकडे यांनी ढुंकूनही कधी पाहिलं नाही. मुळात मुंबई बाहेरही राज्य आहे, हेच त्यांना माहिती नाही. मुंबईसाठी बलिदान, मुंबईसाठी लढा, मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव, मुंबई महानगर पालिका, मुंबईचा मराठी माणूस, केवळ मुंबई... मुंबई आणि मुंबई. त्यामुळे गडचिरोली जिल्हा तेथील सर्वसामान्य आणि गरीब गोंडी, माडिया बोलणारा आदिवासी, इथला मराठी माणूस आणि त्यांच्या विकासाचा प्रश्न यांना कसा दिसणार? हा तो दिसतो केवळ सत्तेबाहेर असताना. १९९५ पासून जेव्हा जेव्हा सत्तेत होते तेव्हा तेव्हा यांच्याकडे नगरविकास आणि परिवहन खातं राहिलं आहे. शिवाय १९९५ मध्ये वनविभाग, कृषी, सामाजिक न्याय, कौशल्यविकास, उद्योग, रोजगार खाते देखील शिवसेनेकडे होते. काय प्रगती केली महाराष्ट्राने या काळात कृषी क्षेत्रात, उद्योग क्षेत्रात हे महाराष्ट्राने बघितलेच आहे. किती रोजगार दिलेत, किती उद्योग आणलेत, मुंबई, मुंबई करत आपली राजकीय पोळी शेकणाऱ्यांनी मुंबईच्या विकासात काय दिवे लावलेत. बेस्ट आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचं काय वाटोळं केलं हे काही लपलेलं नाही.

हा मधल्याकाळात ठाकरेंच्या मंत्रिमंडळात असलेले मंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोलीचं पालकत्व स्वीकारल्यानंतर त्यांनी गडचिरोलीसाठी थोडी धडपड करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अयशस्वी याच्यासाठी मंत्रिमंडळाचे प्रमुख, शिंदेंचेच पक्षप्रमुख उद्धव ठाकरे होते. आणि त्यांच्याकडून कुठलेही सहकार्य, निधी त्यांना मिळत नव्हता. उलट त्यांच्या कामात अडथळा निर्माण केला जात होता. त्यांच्या मंत्रालयात आदित्य ठाकरे आणि त्याचा मावस भाऊ वरुण सरदेसाई हे सातत्याने दखल देत असल्याचे नंतरच्या काळात समोर आले. एवढंच नव्हे तर, गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या जीवाला नक्षल्यांकडून धोका असल्याचा अहवाल गुप्तचर विभागाकडून आल्यानंतर गृहविभागाने झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला. तेव्हा मुख्यमंत्री असलेल्या ठाकरेंनी त्यावेळच्या गृहमंत्री शंभुराज देसाईंना फोन करून यावर अंमलबजावणी करण्यास मज्जाव केला. शिंदेंना सुरक्षा देऊ नये असे निर्देशच त्यांनी गृहमंत्र्यांना दिले होते. एकतर स्वतः घरी बसून अंडी उबवणार आणि काम करणाऱ्या माणसाच्या कार्यात आडकाठी आणणार. असले उद्योग ठाकरेंनी घरी बसून केले.

जेव्हा ठाकरे स्वतः मुख्यमंत्री होते, तेव्हा शेतकरी, कष्टकरी, दीन दलित, आदिवासी, महिला या सगळ्यांसाठी काम केलं असतं तर, कदाचित आज सल्ले देण्याची वेळ आली नसती. सत्तेबाहेर असताना यांना अनेक समस्या, अनेक प्रश्न, अनेक कामं, जनता, शेतकरी, महिला, कामगार, कष्टकरी, संपकरी सगळं आठवते. शेतकऱ्यांना कर्जमाफी नको, कर्ज मुक्ती देण्याची मागणी २०१४ मध्ये स्वतः सत्तेत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना हेच ठाकरे सल्ला देत होते. आपलंच सरकार आहे हे माहीत असताना, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन हेक्टरी ५० हजार देण्याची मागणी करत होते. आणि २०१९ मध्ये स्वतः मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या संपूर्ण अडीच वर्षांच्या कार्यकाळात ना शेतकरी कर्जमुक्त केला, ना शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत कधी दिली. अवकाळी आणि वादळामुळे झालेल्या नुकसानीची मदत सुद्धा दिली नाही. एक नवा उद्योग राज्यात आणला नाही, उलट आलेले प्रकल्प यांच्या वसुली धोरणामुळे त्रस्त होऊन राज्याबाहेर गेले. देवेंद्र फडणवीसांनी मंजुरी दिलेल्या अनेक विकासाच्या प्रकल्पांना निव्वळ स्थगिती देण्याचं तेवढं काम ठाकरेंनी केलं. कायदा व सुव्यवस्था तर यांच्याकाळातली बोलायचं कामंच नाही. स्वतः पोलिसच अपहरण करत होते, पोलिसच वसुली करत होते, पोलिसच हत्या करत होते. हप्ता वसुली प्रकरणी गृहमंत्री स्वतः तुरुंगात गेल्याची राज्याच्या राजकीय इतिहासाला काळिमा फासणारी घटना यांच्या काळात घडली. दोन मंत्री तुरुंगात जाण्याचा रेकॉर्ड ठाकरे सरकारच्या नावे आहे. खून, बलात्कार, धार्मिक कट्टरतावादातून हत्या यासारखे प्रकार तर राजरोसपणे होऊ लागले होते. बिहारप्रमाणे बाहुबली मंत्री सर्वसामान्य नागरिकाचे अपहरण करून बंगल्यावर मारहाण करण्याचा रेकॉर्डही ठाकरे सरकारच्या नावेच आहे. हे सगळं एकच गोष्ट उद्धृत करते ती म्हणजे राज्य चालवणे ''इनके बस की बात नहीं'', यांची लायकी नाही. त्यामुळे हे लोक देखील जो करू शकतो त्यांच्याकडूनच अपेक्षा करत असावेत, असा एक निष्कर्ष यातून निघतो.

९२७०३३३८८६

वाचक पत्रे

अमेरिकेत नववर्षात झालेले अतिरेकी हल्ले

नववर्षाच्या दिवशी अमेरिकेसारख्या प्रगत व पुढारलेल्या देशात - न्यू ऑरलियंस, लास व्हेगास व न्यू यॉर्क अशा तीन ठिकाणी झालेले अतिरेकी हल्ले, ही समस्त जगाला धोक्याची घंटा आहे. संपूर्ण जगात मुस्लिम अतिरेक्यांचे वाढते धाडस हे विश्वशांतीला घातक आहे. अमेरिकेचे मावळते शासन हे अतिरेक्यांसाठी मवाळ होते. बायडेन सरकारने, ईल्हान ओमर या आफ्रिकन बाईला आपल्या परराष्ट्र मंत्रालयात महत्त्वाच्या पदावर नेमले होते. या बाईचे विचार वर्णद्वेष्टे व अतिरेकी विचारसरणीला पोषक आहेत व ती अनधिकृतरित्या अमेरिकेत शिरली आहे, हे नुकतेच अमेरिकन सरकारच्या निदर्शनास आले व लवकरच तिची हकालपट्टी होणार आहे. या अतिरेकी विचाराच्या बाईला आपले विरोधी पक्षनेते राहुल गांधी का भेटत होते, त्यांचे गुरू जॉर्ज सोरोस यांची तर यामागे प्रेरणा नव्हती ना, याबद्दल सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. निर्वासित बनून आलेले परदेशी नागरिक आता जर्मनी, फ्रान्स व इतर युरोपियन देशांमध्ये सरकारची व तेथील जनतेची डोकेदुखी झालेले आहेत व त्यांना देशाबाहेर हाकलण्याची मागणी वाढत आहे. आपल्या देशातही रोहिंग्यांची हकालपट्टी होणे व त्यांची परत आयात न होऊ देणे, देशाच्या सुरक्षिततेसाठी व शांततेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

गणेश ज. हजारे/८६९८८१५५५९

समाजसेवा म्हणजेच ईश्वरसेवा

मनुष्याने सुखाचा विचार न करता जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. जे जीवन आपल्या वाटेला आले ते समजून घेऊन त्याप्रमाणे जीवन जगावे. जीवन हे परमेश्वराने दिले असते त्यातही चढ-उतार असतो. काही दिवस आनंदाचे असतात तर काही दिवस चिंता करणारे असतात. पण मनुष्याने अशावेळी स्वत:ला विसरून जाऊ नये आणि मृत्यू हा परमेश्वराने ठरवलेला असतो. तेव्हा जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत प्रामाणिकपणे देशासाठी, समाजासाठी जगणे हेच आपले कर्तव्य आहे. परमेश्वराने आपल्याला जगात सत्कर्म करून समाजाचा उत्कर्ष करण्यासाठीच पाठवलेले आहे. हे आपण ओळखून विवेकबुद्धीने समाजसेवा करावी. यातच जीवनाचा खरा अर्थ आहे, मोक्ष आहे. मानवजन्म श्रेष्ठ समजून समाजसेवा हीच सेवा आहे असे मानून जगण्याचा आनंदच वेगळा आहे.

मधुकर अमृत डबीर/९८२२६१५३३१

प्राध्यापक बनले वेठबिगारी!

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये सीएचबी प्राध्यापकांची अवस्था अत्यंत दयनीय असून, तुटपुंज्या वेतनावर घरातील खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, आरोग्याचा खर्च भागत नसल्याने टपरी, वडापावचा गाडा, भाजीपाला, रंगकाम, गवंडी काम करून उदरनिर्वाह करावा लागत असल्याचे चित्र सध्या राज्यात दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांपासून राज्यात प्राध्यापकांची भरती न केल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयांमध्ये असंख्य जागा रिक्त आहेत. अशा रिक्त जागांच्या ठिकाणी स्वतः महाविद्यालये सीएचबी तत्त्वानुसार प्राध्यापकांची भरती करीत असून त्यांना दर महिन्याला फक्त दहा ते पंधरा हजार एवढे तुटपुंजे वेतन मिळत आहे. काही ठिकाणी तर सीएचबी तत्त्वावर काम करणारे असे प्राध्यापक आहेत की, त्यांनी पात्रतेच्या निकषापेक्षाही उच्च पदव्या हस्तांतरित केलेल्या आहेत. जसे, उच्च पदवी, सेट, नेट, पीएच. डी., एलएलबी व इतर काही पदव्या. पण सरकार भरतीला देत असलेल्या चालढकलीमुळे हा सर्व तासिका तत्त्वावर काम करणारा प्राध्यापक वर्ग त्रस्त असून, अशी वेठबिगारीची कामे करण्याशिवाय त्यांच्याकडे गत्यंतरच उरले नाही.

राज्यातील काही महाविद्यालयांमध्ये तर असे उच्चशिक्षित प्राध्यापक आहेत की, भविष्यात आपण कायम होणार या आशेवर राहून, त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य सीएचबी तत्त्वावर काम करून घालविले. तरी पण प्राध्यापक भरतीचा पत्ता नाही. नोकरीमध्ये कायम नसल्याकारणाने कोणी मुलगी देण्यास तयार नाही. वय होत चालले आहे. अशा अनेक यातना कामात कायम नसणाऱ्या वरिष्ठ प्राध्यापकांच्या आहेत. आणि त्याचबरोबर अनेक पालकांनी मुलगा वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक आहे. कायम नसला म्हणून काय झाले. आज ना उद्या तो होईल. या आशेवर राहून त्यांनी आपल्या एकुलत्या एक मुली अशा मुलांना दिल्या आहेत. कुटुंबाचा व मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागत नसल्याने अनेक शहरी भागातील सी. एच. बी. तत्त्वावर काम करणारे प्राध्यापक सकाळ व संध्याकाळ या दोन सत्रांत काम करत आहेत. सकाळी ६ वाजता लवकर घरातून बाहेर पडायचे ते रात्री ११ वाजता घरी यायचे असा यांचा दिनक्रम असल्या कारणाने घरातील व्यक्तींना वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे राज्य व केंद्र सरकारने लवकरात लवकर वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक भरतीला सुरूवात करून सी.एच.बी. तत्त्वावर काम करणाऱ्या लोकांना कायम करून त्यांचे पुढील आयुष्य वेठबिगारी म्हणून नाही तर प्राध्यापक म्हणून जगू शकतील.

प्रा. सचिन जाधव/८४२५००३१२७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daniktarunbharat.com

संक्षिप्त वृत्त...

राणीसावरगावच्या शेतकऱ्याने केली आत्महत्या

सोनपेठ,/प्रतिनिधी : राणीसावरगांव येथील भगवान मोतीराम राठोड या ४० वर्षीय शेतकऱ्याने आठवडी बाजारातील सार्वजनिक विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली.

सूर्यकांत चव्हाण यांनी पिंपळदरी पोलिस ठाण्यात या संदर्भात माहिती दिली. राठोड हे शेतीतील नापिकिमुळे मुलाबाळांचे पालनपोषण करु, या चिंतेपोटी वैफल्यग्रस्त झाले होते. त्यातूनच १ जानेवारी रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास त्यांनी आत्महत्या केली, असे नमूद केले.

अपघातात जखमी झालेल्या मुलीचा मृत्यू

परभणी,/प्रतिनिधी : सोनपेठ तालुक्यातील शिर्शी बु. शिवारात ट्रॅक्टर व ॲपे ऑटोच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या निधी ढवळे या १३ वर्षीय मुलीचा गुरुवारी रात्री परभणीतील खाजगी रुग्णालयात मृत्यू झाला.

शिर्शी बु. शिवारात ३० डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास एम.एच.२३ एच.१८४१ या क्रमांकाच्या ॲपे ऑटोतून ढवळे कुटूंबिय जात होते. त्यावेळी पाठीमागून एम.एच. २२ ए.एम.४०६६ या क्रमांकाच्या ट्रॅक्टरच्या हेडने जोरदार धक्का दिला. त्त्याा ऑटोतील अनेक व्यक्ती जखमी झाल्या. निधी ढवळे या गंभीर जखमी झालेल्या मुलीस परभणीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचार सुरु असतांना गुरुवारी रात्री त्या मुलीचा मृत्यू झाला. दरम्यान, या प्रकरणात सोनपेठ पोलिसांनी नितीन ढवळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन ट्रॅक्टर चालक माणिक नरोजी खांडेकर याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मंजूर निधी परत जाता कामा नये- जिल्हाधिकाऱ्यांव्दारे तंबी

परभणी,/प्रतिनिधी : जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मंजूर नियतव्ययानुसार विविध विकास कामे विहित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. कालावधी कमी असल्यामुळे ज्या विभागांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही अद्याप झालेली नाही, त्यांनी तात्काळ कार्यवाही पूर्ण करुन विकास कामे सुरु करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज शुक्रवार ३ जानेवारी रोजी जिल्हा वार्षिक योजनेबाबत आढावा बैठक पार पडली. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा नियोजन अधिकारी किशोरसिंग परदेशी, समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त गीता गुट्टे आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, चालू वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेचा निधी हा विकास कामांवर खर्च करण्यासाठी कमी कालावधी उरला आहे. मंजूर नियतव्ययानुसार विविध विकास कामे विहित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार व्हावीत. तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन विकास कामे सुरु करावीत. मंजूर संपूर्ण निधीचा विनीयोग करावा. निधी परत जाता कामा नये, याची खबरदारी घ्यावी. सर्व विभागांनी आयपास प्रणालीचा वापर करूनच कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षातील कामांचाही आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचित केले.

वाचन संस्कृती जोपासली पाहिजे- पोले

परभणी,/प्रतिनिधी : वाचन संस्कृतीचे जीवनातील महत्व ओळखून वाचन संस्कृती जोपासली पाहिजे, वृध्दिंगत केली पाहिजे, असे मत प्राचार्य कांतराव पोले यांनी शुक्रवारी केले.

राणीसावरगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र व पंच भाषा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाड्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.नसिंगदास बंग, समन्वय डॉ. श्रीहरी चव्हाण यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी कै. डॉ.शिवाजीराव दळणर यांच्या प्रतिमेचे पूजन केले त्यानंतर विद्यार्थ्यांचा सत्कार शिक्षक वृंदांनी केला.

पुढे बोलतांना डॉ. पोले म्हणाले, साहित्या भरपूर आहे, काय वाचलं पाहिजे आणि काय वाचलं नाही पाहिजे हे ज्या विद्यार्थ्याला कळाले तोच विद्यार्थी आयुष्यात यशस्वी झाला आहे. सत्वपरीक्षेतून समोर जाण्यासाठी वाचन असणे आवश्यक आहे. वाचन संस्कृती जोपासली तर आयुष्यात विद्यार्थी बेरोजगार राहणार नाही, कारण वाचन संस्कृती ही तिमीरातुनी तेजाकडे नेणारी वाट आहे. मासिकांमधून आणि वृत्ततपत्रातून समाजातील घटना देशातील नावीन्यपूर्ण माहिती इत्यादी ज्ञान मिळते, याचाही फायदा विद्यार्थ्यांना होत असतो, असेही त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. बंग म्हणाले, वाचनामुळे मानव हा मुक्त वातावरणात वावरत असतो. त्याचबरोबर शब्दसंग्रह साठवून स्पष्ट बोलणारा वक्ता म्हणून समोर येतो. वाचनाचे फायदेच आहेत नुकसान नाही आपली स्मरणशक्ती एकाग्रता वाढत असून आपल्या लिखाणामध्ये एक प्रकारची धार, लय येत असते, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्कृत विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अभय पाटील यांनी केले तर सूत्रसंचलन डॉ. शंकर घाडगे यांनी केले आभार डॉ. श्रीहरी दासू चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाला शिक्षक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परभणी जिल्हयात थंडी वाढली

परभणी,/प्रतिनिधी : परभणी जिल्हयात गेल्या दोन दिवसापासून थंडीचा जोर वाढला असून नागरिकांना सकाळच्या वेळी बाहेर पडणे देखील अवघडच बनलेले दिसत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत ही थंडी आणखीनच वाढलेली दिसून येणार आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

परभणीत प्रंचड मुक मोर्चा ठरला लक्षवेधी

मस्साजोग प्रकरण : सर्वपक्षीय, सर्वधर्मीय, सर्वजातीय व सामाजिक क्षेत्रातील नेतेमंडळीसह पदाधिकाऱ्यांसह हजारोंचा जनसमुदाय सहभागी, महिलांचीही लक्षणीय उपस्थिती ठरली लक्षवेधी

परभणी ,/प्रतिनिधी:- बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या सर्व आरोपींना तातडीने अटक करून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, या प्रमुख मागणीसाठी शनिवारी (दि.४) परभणीमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय, सकल मराठा समाज व अन्य संघटना व प्रतिष्ठानांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड असा मूक मोर्चा काढला.

जिंतूर रस्त्यावरील नूतन म हाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारी सकाळपासूनच कार्यकर्त्यांनी रेलचेल सुरु झाली. विशेषतः सर्व तालुकास्थानांसह तालुक्यातून एका पाठोपाठ एक भरगच्च अशी वाहने मोठ्या संख्येने दाखल होत होती. चोहोबाजूंच्या वाहनांच्या या रांगांमुळे गंगाखेडं, जिंतूर, पाथरी व वसमत रस्त्यावरील वाहतूक पूर्णतः कोलमडली. तरुणांसह महिला व अबालवृध्दांचेसुध्दा मोठ मोठे जथ्ये या मैदानावर पोहोचले. त्यामुळे या संपूर्ण परिसर अक्षरशः गजबजला. भगवे झेंडे, गळ्यांमधून भगवे रुमाल, निषेधांचे फलक तसेच स्व. देशमुख यांच्या प्रतिमेसह हे जथ्ये, हजारो कार्यकर्ते अत्यांत शिस्तबध्द पध्दतीने दुपारी १ वाजेच्या सुमारास येथून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निघाले. या मोर्चात संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर, खासदार बजरंग सोनवणे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, ज्योतीताई मेटे, स्थानिक खासदार संजय जाधव, ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेश वरपुडकर, माजी आमदार सुरेशदादा देशमुख, आमदार डॉ. राहुल पाटील, माजी आमदार ॲड.विजय गव्हाणे, आमदार राजेश विटेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष प्रताप देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख व्यंकटराव शिंदे, प्रविण देशमुख, माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे, डॉ. विवेक नावंदर, डॉ. विद्या चौधरी, रविराज देशमुख, सुरेश भुमरे, काँग्रेसचे महानगर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, भारतीय जनता पार्टीचे नेते डॉ. केदार खटींग, सुभाष जावळे पाटील, गणपत भिसे, अजयराव गव्हाणे, श्रीधरराव देशमुख, अमोल देशमुख, विनोद कदम, सुनील देशमुख, सचिन देशमुख, किशोर रणेर यांच्यासह अन्य नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते. मोर्चाच्या दरम्यानसुध्दा व्यापाऱ्यांसह नागरीक उत्स्फ ूर्तपणे सहभागी होत होते. काही भागात मोर्चा दरम्यान व्यापाऱ्यांनी आपआपले व्यवहार बंद ठेवून मूक मोर्चास उत्स्फूर्तपणे समर्थन दिले.

मोर्चा महाराणा प्रताप चौक -शनी मंदिर - नानल पेठ कॉर्नर- छत्रपती शिवाजी चौक- गांधी पार्क- नारायण चाळमार्गे म हात्मा फुले पुतळा परिसरात मोर्चा पोहोचला. तेथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात या मोर्चाचा समारोप झाला. या मोर्चा दरम्यान पोलिस यंत्रणेने मोठ्या संख्येने अधिकारी, कर्मचारी तसेच राज्य राखीव दलाच्या कंपन्याही ठिकठिकाणी तैनात केल्या होत्या. संपूर्ण मोर्चा अत्यांत शांततेत व शिस्तबध्द पध्दतीने झाला.

देशमुख यांचे कुटुंबीय सहभागी....

परभणीत निघालेल्या या प्रचंड मोर्चात स्व. देशम ुख यांच्या मातोश्री तसेच त्यांचे बंधू, बहिण, मुलगी व मुलगा सहभागी झाले होते. या मोर्चाचा समारोप सभेतून झाला. त्यावेळी देशमुख कुटूंबिय व्यासपीठावर उपस्थित होते. त्यापैकी काहींनी आपल्या भावना व्यक्त केल्या तेव्हा हजारोंचा जनसमुदाय अक्षरशः हळहळला.

एकलव्य माध्यमिक विद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

जिंतूर,/प्रतिनिधी- एकलव्य माध्यमिक विद्यालय व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त भव्य ग्रंथ प्रदर्शनाच्या आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय गीते सर प्रमुख पाहुणे म्हणून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय चे ग्रंथपाल किशोर नेटके आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम सर्व म ान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिम ेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

प्रमुख पाहुणे यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा दिनांक १/१ २०२५ ते १५/ १/ २०२५ पर्यंत आयोजन केलं आहे.

या संकल्प मध्ये विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी व प्रत्येक ग्रंथाची ओळख निर्माण व्हावी असे या वाचन संकल्पना चे उद्दिष्ट आहे असे मत नेटके यांनी केले. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक गीते सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांने साहित्याचे वाचन करून ते आत्मसात केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

पारव्यात शेतमजूर महिलेवर अत्याचार

दरोडेखोरांचा धुमाकूळ : जीवघेण्या हल्ल्यात तिघे जखमी

परभणी,/प्रतिनिधी : तालुक्यातील पारवा शिवारातील एका आखाड्यावर सशस्त्र दरोडेखोरांनी शुक्रवार ३ जानेवारी रोजी पहाटे मोठा धुमाकूळ घातला. कुटूंबातील तीघांना बेदम मारहाण करीत खोलीत कोंडून ठेवले अन् एका महिलेवर अत्याचार केल्याची खळबळजनक माहिती हाती आली आहे.

पारवा शिवारातील या आखाड्यावर सालगडी असणारे एक कुटूंब वास्तव्यास आहे. हे कुटूंब दैनंदिन कामे आटोपून रात्री उशीरा झोपी गेले. तेव्हा मध्यरात्री किंवा शुक्रवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात सशस्त्र दरोडेखोरांनी आखाड्यावर प्रवेश केला. पाठोपाठ आखाड्यावरील त्या सालगडी दाम्पत्यास व वयोवृध्द महिलेस बेदम मारहाण सुरु केली. कुटूंबातील सर्व सदस्यांना एका खोलीत डांबून या दरोडेखोरांनी कुटूंबातील एका महिलेवर सामुदायिक अत्याचार केला. अन् तेथून पोबारा करतेवेळी आखाड्यावरील या कुटूंबाजवळील आहे ते दागिणे लंपास केले. या घटनेने हे कुटूंबिय अक्षरशः हादरले. खोलीत बंद असलेल्या या कुटूंबियांना शुक्रवारी सकाळपर्यंत मदत मिळाली नाही, अशी माहिती हाती आली असून मदत मिळाल्यानंतरच काहींनी धाव घेवून कुटूंबातील जखमींना परभणीच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केल्याचे वृत्त हाती आले आहे.

या घटनेबाबात शुक्रवारी सायंकाळी उशीरापर्यंत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला नव्हता, परंतु पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, अप्पर पोलिस अधिक्षक यशवंत काळे, सहाय्यक पोलिस अधिक्षक ऋषिकेश शिंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी दिगांबर डंबाळे, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलिस निरीक्षक चितांबर कामठेवाड, श्रीकांत डोंगरे, चंद्रसेन देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी या आखाड्यावर रात्री उशीरापर्यंत ठाण मांडून होते. घटनेबाबत पंचनामाही करण्यात आला. दरम्यान, या प्रकरणात जिल्हा पोलिस अधिक्षक परदेशी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून त्या सशस्त्र दरोडेखोरांचा मागोवा घेण्याकरीता काही विशेष पथके तैनात करुन ती रवानासुध्दा केली असल्याची माहिती हाती आली आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून परिचारीकांचे कार्य कौतूकास्पद : शल्य चिकीत्सक डॉ. लखमावार

परभणी ,/प्रतिनिधी- स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दिवस, रात्र रुग्णसेवेत केवळ नौकरी म्हणुन नव्हे तर संकट काळात सामाजिक बांधिलकी म्हणून परिचारिका काम करत असतात हे कोरोना काळात अनुभवले आहे. आजही त्याच निष्ठेने त्यांचे कार्य सुरु आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.नागेश लखम ावार यांनी केले.

येथील धनेश्वरी मानव विकास मंडळ संचलित परभणी नर्सिंग कॉलेज बी.एसस्सी. नर्सिंग विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा शपथ ग्रहण समारंभ दि.२ जानेवारी रोजी परभणी मेडिकल कॉलेज येथे पार पडला. यावेळी डॉ. लखमावार बोलत होते.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष तथा वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, पेडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुभाष कदम, डॉ.जयदेव उघडे, डॉ. गुरुनाथ बिराजदार, प्राचार्य एस आरती उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. लखम ावार यांनी परिचारिकांच्या कार्याचा आढावा घेतला. नर्सिंग क्षेत्राशी जोडल्या जाणाऱ्या परिचारिका सर्वात आधी रुग्णांच्या अहारोत्र सेवेची प्रतिज्ञा घेतात. ज्याप्रमाणे जगातील पहिल्या परिचारिका प्लेरेन्स नाइटिंगेल यांनी मेणबत्ती घेऊन रुणांची सेवा केली त्याचप्रमाणे आपण देखील रुग्णांची सेवा करुन त्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करू व त्यांना प्रकाशाकडे नेऊ यासाठी शपथ घेतली जाते असे सांगीतले. यावेळी प्राचार्य एस.आरती यांनीही मार्गदर्शन केले. नर्सिंग म हाविद्यालयात उत्तम प्रकारच्या परिचारिका घडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सेवाभावी वृत्तीने रुग्णांची सेवा करणायांची वृत्ती नवीन पिढीत वृर्धीगत करायला हवी असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमासाठी प्रशासकीय अधिकारी विशाल आहेर, प्रा. ऋषिकेश गायकवाड, प्रा.गायत्री वाघमारे, प्रा.क्षितिजा रोडे, प्रा. सुप्रिया वाघ, सौरभ कुलथेआदींनी पुढाकार घेतला.

श्री.रंगनाथ महाराज यांची जयंती विविध उपक्रमातून साजरी

सोनपेठ,/प्रतिनिधी- सोनपेठ येथील श्री रंगनाथ म हाराज प्रतिष्ठानच्या माध्यमातून एका चांगल्या उपक्रमाने नवीन वर्षाची सुरुवात करण्यात आली. बुधवार दि.१ जानेवारी रोजी श्री रंगनाथ महाराज यांच्या ५५ व्या पुण्यतिथी निमित्ताने, रंजल्या गांजलेल्या बालकांची सेवा करण्याचा वसा घेतलेल्या बीड जिल्ह्यातील आनंदग्राम आणि शांतीवन येथील आश्रम ातील मुलांना भेट देऊन एक दिवस त्यांच्या सहवासात राहून घालवला. यावेळी सोबत प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व सोनपेठ येथील पत्रकार आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

यावेळी बीड जिल्ह्यातील पाली येथील आनंदग्राम या एचआयव्ही संक्रमित मुलांच्या आश्रमास भेट देऊन मुलांना फळे, ब्लँकेट वाटप करण्यात आले. आणि आनंदग्राम चे संस्थापक श्री दत्ता बारगजे यांची सपतीक सदिच्छा भेट घेतली आणि त्यांच्या कार्याची प्रशंसा करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच पूजा रेडीमेड सोनपेठ यांच्यावतीने आनंदग्राम येथील बालकांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर बीड जिल्ह्यातील आर्वी येथील श्री दीपक नागरगोजे यांनी सुरू केलेल्या शांतीवन या अनाथ आश्रमात जाऊन तेथील विद्यार्थ्यांना फळे व उबदार ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. तसेच आश्रमातील ० ते १ वर्षे वयाच्या बालकांना दुध जन्य डब्बे देण्यात आले.तसेच संस्थापक श्री दिपक नागरगोजे यांचा सपतीक सदिच्छा सन्मान करुन त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. दोन्ही आश्रम ातील बालका सोबत संपूर्ण दिवस घालवताना एकीकडे आनंद वाटत आसला तरी दुसरीकडे त्यांच्या अयुष्यासोबत नियतीने मांडलेल्या क्रुर पनाच्या दुःखाने नकळत सर्वांचेच डोळे ही पानावले असल्याचे सांगितले. यावेळी सोबत श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते,भारत राष्ट्र समितीचे महाराष्ट्र समन्वयक सुधीर बिंदू, जय भवानी मित्र मंडळाचे अध्यक्ष बळीराम काटे, सोनपेठ तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबासाहेब गर्जे, पत्रकार राधेश्याम वर्मा, सोमनाथ नागुरे, सुभाष सावंत, महादेव नरवटे हे उपस्थित होते.

रस्ता सुरक्षा अभियान ही लोकचळवळ झाली पाहीजे- जिल्हाधिकारी

हिंगोलीत रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त भव्य बाईक रॅली

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ जानेवारी

रस्ता अपघातात देशात दरवर्षी लाखो लोकांना जीव गमवावा लागत आहे. रस्ता सुरक्षा अभियानातून दरवर्षी जनजागृती केली जाते. रस्त्यावरून वाहन चालवतांना जबाबदारी, नियमांचे पालन, सुरक्षितता पाळली पाहीजे. यासाठी शाळांच्या माध्यमातून घराघरापर्यंत रस्ता सुरक्षा अभियान पोहचवून लोकचळवळ निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले.

रस्ता सुरक्षा अभियानांनिमित्त उपप्रादेशिक परिवहन विभाग, वाहतुक पोलिस शाखा तसेच पोलिस विभागाच्या संयुक्तविद्यमाने जनजागृती करण्यासाठी दि ४ जानेवारी रोजी डोक्याला हेल्मेट घालून मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांची तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, एसआरपीएफचे समादेशक श्रीमती पोर्णिमा गायकवाड, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती अश्विनी स्वामी. जगदीश माने आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी रस्ता सुरक्षा ही देशाची मोठी समस्या बनली आहे. दररोज अनेक होतात. केवळ निष्काळजीपणा आणि रस्ता सुरक्षांचे नियम न पाळल्याने होत आहेत. यासाठी वर्षभर जनजागृती करण्याची गरज आहे. तरूणाई ओव्हर स्पीड गाडी चालवित आहे. काही अल्पवयीन मुले मुलीही वाहने चालवतांना दिसतात. आता कायद्याने अशा मुलांच्या पालकांवर कार्यवाही करण्यात येत आहे. तरूणाईने वाहन चालवतांना वाहन चालविण्याचा परवाना तसेच वाहना-वरील नियंत्रण ठेवणे महत्वाचे आहे. अपघातातील मृतांमध्ये तरूणांची संख्या जास्तआहे. त्यासाठी तरूणांनी नियमांचे पालन करीत सुरक्षितपणे वाहने चालविले पाहीजे. दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेट अतिशय महत्वाचे असून अपघातावेळी आपला जीव या हेल्मेटमुळेच वाचू शकतो.

यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी उपप्रादेशिव परिवहन विभागाला शाळांमध्ये रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती करावी तसेच त्यांना काही सुरक्षेसंदर्भात छोट्या छोट्या क्लीप्स दाखवून जनजागृती करण्याचे आवाहन केले.

यानंतर संत नामदेव पोलिस कवायत मैदानावरून हेल्मेट परिधान करून भव्य मोटार सायकल रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. या रॅलीमध्ये उप प्रादेशिक परिवहन विभाग, वाहतुक पोलिस शाखेचे कर्मचारी, जिल्हा पोलिस कर्मचारी, राज्य राखीव दलाचे कर्मचारी, शिक्षक, शिक्षिका तसेच एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिला मेळावा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ जानेवारी

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वती-ने येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला मेळावा उत्स-ाहात साजरा करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल हस्ते सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करुन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव, समाजसेविका मीराताई कदम, धनंजय कदम, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप, लेखाधिकारी संकेत महाजन, लोकसंचलित साधन केंद्राच्या अध्यक्षा राजमती चांदणे, औंढा लोकसंचलित साधन केंद्राच्या उपाध्यक्षा अनुसया पवार, जिल्हा उद्योग केंद्राच्या उद्योग निरीक्षक सुद-ेशना सवराते, आयसीआयसीआय बँकेच्या शाखा व्यवस्थापक सोनल चोथमल आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते जयाजी पाईकराव व मीराताई कदम यांनी उपस्थित महिलांना म ार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी महिलांसाठी बचत गटामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उद्योग, प्रशिक्षण सुविधा, नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीएमआरसीचे व्यवस्थापक सुनिल चव्हाण यांनी केले. तर आभार माविमचे गजानन खिरोडकर यांनी मानले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्ह्यातील जास्त कर्ज मिळालेल्या गटांचा तसेच ग्रामीण भागात उत्कृष्ट काम करणाऱ्या सीआरपी-चा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना गिताने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लेखाधिकारी संकेत महाजन, प्रसाद मानेकर, संतोष ठाकूर, रफिक सय्यद, सर्व सीएमआरसी व्यवस्थापक, लेखा-पाल, सल्लागार, सहयोगिनी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास बचतगटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी मोफत प्रशिक्षणासाठी उद्योजकता केंद्राकडे नोंदणी करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ जानेवारी

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सोलर पॅनल इंस्टॉलेशन तसेच अमृत बेकरी व अमृत आयात निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील अमृत संस्थेच्या लक्ष्यीत गटातील उम ेदवारांसाठी अमृत सोलार पॅनल हा कार्यक्रम ७ ते २४ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित केला आहे. सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती, महिलांसाठी निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येईल. हे कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर व लातूर या ठिकाणी होणार आहेत.

सोलर ऊर्जा निर्मितीसाठी शासना-ने सबसिडीच्या दरामध्ये शेतकरी तसेच लाभार्थ्यांना सोलर पॅनल देत आहेत. परंतु सोलर पॅनल, इन्स्टॉलेशन, मेन्टेनन्स दुरुस्ती करणारे मनुष्यबळ कमी प्रमाणात उपलब्ध आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवक, युवती व महिलांना रोजगार व उद्योग करण्याची संधी या प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध होणार आहे.

तसेच हिंगोली जिल्ह्यातील आयात निर्यात वाढीच्या दृष्टिकोनातून बेरोजगारांना रोजग-ाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी अमृत आयात-निर्यात या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. बेकरी व्यवसायास नवीन तंत्रज्ञानाच्या आधारावर रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी अमृत बेकरी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

वरील तीनही प्रशिक्षणाकरिता उमेदव-ाराची प्रत्यक्ष निवड मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे उमेदवाराची निवड करण्यात येणार आहे. यासाठी किम ान शैक्षणिक पात्रता बारावी असून पदवीधर व तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असेल. यासाठी किमान वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष आहे. अधिक माहिती व नोंदणीकरिता म हाराष्ट्र उद्योजकता केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला एस-१२, जिल्हाधिकारी प्रशासकीय कार्यालय, नांदेड रोड, हिंगोली या ठिकाणी व मो. न. ९७६५२९१७८५ वर संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्यो जकता विकास केंद्र, हिंगोली यांनी केले आहे.

हिंगोली- उपप्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर हेल्मेट परिधान करून मोटार सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीला हिरवी झेंडी दाखवतांना पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीखक श्रीकृष्ण कोकाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना पाटील, शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के आदी.

गुन्हेगारी करणारे १३ सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून हद्दपार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ जानेवारी

हिंगोली उपविभागातील गुन्हेग-ारी कृत्य करणाऱ्या १) भिकाजी जगन काळे रा. पारधीवाडा ता.जि.हिंगोली, २) अभय वसंत चव्हाण रा. पारधीवाडी ता.जि. हिंगोली, ३) रविकुमार ऊर्फ कुम ार संजू काळे रा.सिध्दार्थ नगर हिंगोली जि.हिंगोली, ४) अम ोल संतोष पवार रा.पारधीवाडा ता.जि.हिंगोली, ५) शंकर बाळाराम गांधी रा.तलाबकट्टा ता.जि.हिंगोली, ६) ऋषीकेश भागवत टाले रा.खुडज ता. सेनगाव जि.हिंगोली, ७) भारत हरी काळे रा.पारधीवाडा, नर्सी नामदेव ता.जि.हिंगोली, ८) शेख कदीर शेख सुलेमान रा.लिंबाळा मक्ता ता.जि.हिंगोली, ९) गौरव राजू गायकवाड रा.रिसाला बाजार ता.जि.हिंगोली, १०) अनिल लक्ष्मण महाजन रा. सेनगाव ता.सेनगाव जि. हिंग-ोली, ११) फैझल खान रहीम खान रा.सिटी बेकरी जवळ, पूरपीडित कॉलनी, अकोट रोड, अकोला, १२) सय्यद सलमान सय्यद मुस्ताफ रा. खरबी ता.जि. हिंगोली व १३) अनिल गणपत काळे रा.खरबी ता.जि.हिंगोली अशा हिंगोली उपविभागातील हिंगोली व सेनगाव तालुक्यातील १३ सराईत गुन्हेगारांना महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ५६ व ५७ अन्वये सहा महिने व एक वर्षासाठी हिंगोली जिल्ह्या-तून हद्दपार करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिले आहेत.

उपविभागीय दंडाधिकारी सम ाधान घुटुकडे यांनी हिंगोली जिल्ह्यातील सराईत गुन्हेग-ार व भारतीय दंड संहिताच्या विविध कलमान्वये गुन्हेगारी करणाऱ्या इसमाविरुध्द पो-लीस अधीक्षक, हिंगोली यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार हद्दप-ारीची कार्यवाही करण्यात येत आहे.हिंगोलीजिल्ह्यातील उपविभागात सार्वजनिक शांतता नांदावी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी नियमितपणे गुन्हेगारांविरुध्द दाखल प्रस्तावाची दखल घेऊन वेळोवेळी कडक व प्रतिबंधात्म क कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिली आहे.

संक्षिप्त वृत्त

विमा सल्लागार भरतीसाठी हिंगोलीत मुलाखती

हिंगोली- परभणी डाक विभागाकडून डाक जीवन विमा आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनेअंतर्गत डायरेक्ट एजंट (विमा सल्लागार) च्या भरतीसाठी दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हिंगोली उप डाकघर, हिंगोली येथे मुलाखती घेण्यात येणार आहेत. यासाठी अर्ज डाकघर अधीक्षक कार्यालय, परभणी विभाग, परभणी येथे उपलब्ध आहेत. सर्व इच्छूक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरुन हिंगोली उप डाकघर, हिंगोली येथे थेट म ुलाखतीसाठी उपस्थित राहावेत, असे आवाहन डाकघर अध-ीक्षक डाकघर, परभणी यांनी केले आहे. अर्ज परिपूर्ण भरुन मुलाखतीसाठी येताना बायोडाटा, मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र घेऊन येणे आवश्यक आहे. या पदासाठी पात्रता व मापदंड पुढीलप्रमाणे आहेत. मुलाखतीच्या दिवशी उमेदवाराचे वय कमीत कमी १८ वर्षे असावे. अर्जदार हा दहावी उत्तीर्ण किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेला असावा. त्याला केंद्रीय, राज्य मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे. बेरोजगार, स्वयं बेरोजगार, माजी विमा सल्लागार, कोणत्याही विमा कंपनीचा माजी विमा एजंट, माजी सैनिक, सेवानिवृत्त शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ते, महिला मंडळ कार्यकर्ते, ग्राम प्रधान, ग्रामपंचायत सदस्य आदींनी टपाल जीवन विमासाठी थेट अर्ज करु शकतात. उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्व-ारे होणार असून व्यावसायिक कौशल्य, व्यक्तीमत्व, जीवन विमाबाबतचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान, स्थानिक भागाची माहिती असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारास पाच हजार रुपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी ला-गेल. जी एनएससी/केव्हीपीच्या स्वरुपात असेल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर डाक विभागाकडून तात्पुरत्या स्वरुपात पर-वाना देण्यात येईल. जो आयआरडीएची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायम स्वरुपाच्या परवानामध्ये रुपांतरीत केले जाईल. ही परीक्षा तीन वर्षाच्या आत उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील. नियुक्ती ही लायसन्स तत्वावर आणि कमिशन तत्वावर राहील, असेही त्यांनी कळविले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन

हिंगोली- भारतीय स्त्री शिक्षणाच्या जननी, थोर समाजस-ुधारक क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी तहसी-लदार (महसूल) आश्विनकुमार माने, नायब तहसीलदार संतोष बोथीकर यांच्यासह प्रशासकीय इमारतीमधील सर्व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ जानेवारी

स्मृतीशेष ॲड ग्यानबाराव शिरसाट सेवाभावी संस्थेचे राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण प्राचार्य शेळके यु एस.यांनी केले. त्यानंतर स्वागत गीत हे पूजा भुरके, उषा शिखरे आरती चव्हाण यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा शेळके यु एस यांनी केले. त्यानंतर. ज्ञानज्योती सावित्री जीवनाविषयी भाषण हे शारदा गांजवे छाया भरकाडे, राधा चिभडे, विद्या पाईकराव या विद्यार्थ्यांनी केले. त्यानंतर २१ व्या शतकातील सावित्री व स्त्री या आजच्या परिस्थितीवर भाष्य करणारे पथनाट्य महाविद्यालयातील ा विद्यार्थ्यांनी सादर केले. महाविद्यालयातील प्रा. डी डी सिरसाट, सौ.बोरकर यांनीही विद्यार्थ्यांना सावित्रीबाई यांच्या जीवना बद्दल मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय भाषण सौ.ज्योती भट यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डोलारे एम.के यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा तरकसे एस टी, प्रा जाधव एस.डी, बोरकर, इंगोले आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतमी नरवाडे व संजना सातपुते या विद्यार्थिनी केले

हिंगोलीत आजपासून राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ जानेवारी

मराठा सेवा संघ, संभाजी बिग्रेड व जिजाऊ बिग्रेडद्वाराच्या हिंगोलीच्या वतीने राजमाता माँ साहेब जिजाऊ व्याख्यानमाला ही २५ वर्षापासुन अखंड सुरू आहे. आज ५ जानेवारी रोजी स्मृतीशेष ॲड. ग्यानबाराव शिरसाट विचारमंच, स्मृतीशेष खा. शिव-ाजीराव देशमुख सभागृह, रामलिला मैदान हिंगोली येथे आज ५ जानेवारी पासुन सुरूवात होणार असून ७ जानेवारीपर्यंत ही व्याख्यानमाला सुरू राहणार असल्याने या व्याख्यान मालेसाठी नामवंत व्याख्यातांना पाचारण करण्यात आले आहे. आज पहिल्या पुष्पाम ध्ये यवतमाळ येथील व्याख्याता नेहाताई टोम्पे यांचे व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानमालेचा हिंगोली शहरासह जिल्ह्यातील नागरिकांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन मराठा सेवा संघ, जिजाऊ बिग्रेड हिंगोलीच्या वतीने करण्यात आले आहे.

हिंगोली येथे राष्ट्रमाता राजमाता माँ. साहेब जिजाऊ व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प यवतमाळ येथील व्याख्याता नेहाताई टोम्पे ह्या मराठ्यांची कुलदैवता आणि स्त्री वर्तमान या विषयावर व्याख्यान गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले ह्या राहणार आ-हेत. तर उद्घाटन अतिरिक्त पोलीस अधिक्षक अर्चना पाटील यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी महिला व बालकल्याण सभापती रुप-ालीताई राजेश पाटील गोरेगावकर, नेत्ररोग तज्ञ डॉ. सोनाली गोपाल कदम तसेच या व्याख्यानासाठी विशेष सहकार्य स्मृतीशेष किरण खंडेराव सरनाईक यांचे स्मरणार्थ वर्षाताई किरण सरनाईक यांचे सहकार्य लाभणार आहे.

द्वितीय पुष्प नांदेड येथील स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठाच्या संचालक प्रा.डॉ. दिलीप चव्हाण हे अमृत महोत्सवी संविधान आणि आजचा भारत या विषयावर व्याख्यान देणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. तान्हाजी मुटकुळे हे राहणार आ-हेत. तर उद्घाटक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर.आर. मगर यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण, राकॉ जिल्हाध्यक्ष (अजित पवार गट) बि.डी.बांगर, भाजपा जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, युवा सेना जिल्हा प्रमुख शिंदे गटाचे रामभाऊ कदम यांची उपस्थिती राहणार आहे. या व्याख्यानास विशेष सहकार्य स्मृतीशेष देवराव फुलाजी शृंगारे यांच्या स्मरणार्थ बाबाराव देवराव शृंगारे यांचे राहणार आहेत.

तर तृतीय पुष्प जालना येथील कीर्तनकार हभप निलेश कुहीरे हे संत विचार आणि आजची लोकशाही या विषयावर व्याख्यान देणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. नागेश पाटील आष्टीकर हे राहणार आहेत. तर उद्घाटक म्हणून जिल्हा परिषदचे समाज कल्याण अधिकारी राजु एडके तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, राष्टीय काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देसाई, एसबीआयचे समन्वयक सिध्देश्वर हनुमान बोरकर, शिवसेना उध्दव गटाचे जिल्हा प्रमुख अजय उर्फ गोपु पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. या व्याख्यानासाठी विशेष सहकार्य स्मृतीशेष ॲड. सुदर्शन मारोतराव ब्रुर्दूक यांच्या स्मरणार्थ संतोष म ारोतराव ब्रुर्दूक यांचे सहकार्य लाभणार आहेत. या कार्यक्रमात मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरूषोत्तम खेडेकर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षे निमित्ताने कार्यक्रम घेतले जाणार आ-हेत. व त्यांचा या ठिकाणी सन्मान केल्या जाणार आहे. यावेळी या व्याख्यानमालेस विशेष सहकार्य शिवाजीराव ढोकर पाटील, वंदनाताई मनोज आखरे, वर्षाताई किरण सरनाईक, पंडीत प्रल्हादराव शिरसाट, प्रा.डॉ. मनिषा पंडीतराव अवचार, बाबाराव देवराव शृंगारे, संतोष मारोतराव ब्रुर्दूक पाटील, दिनकरराव एकनाथराव पिसे पाटील, प्रा.डॉ. सुनंदा नविन सोळंके, प्रा.डॉ. माणिक भिकाजीराव डोखळे, प्रा.वसंत पुंजाजीराव गाडे, शिवाजीराव प्रभाकरराव मेटकर, गंगासागर सुधाकरराव बल्लाळ, बेबीसरोज, हनुमंतराव सावंत, रामदास त्र्यंबकराव कावरखे, विश्वासराव गुलाबराव वानखेडे, संगिताताई राजकुमार वायचाळ, डॉ. प्रकाश सखाराम अंभोरे यांचे सहकार्य लाभले आहे. या तिन दिवशीय जिजाऊ व्याख्यान मालेला हिंगोली जिल्ह्यातील शिवभक्तासह अनेकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मराठा सेवा संघ, संभाजी बिग्रेड व जिजाऊ बिग्रेड यांनी केले आहे.

अवैध धंद्यावर ग्रामीण पोलिसांचा बुलडोजर

तभा वृत्तसेवा
नांदेड ,दि. ०४ जानेवारी

वाढत्या गुन्हेगारीला नष्ट करण्यासाठी अवैध धंद्याला कारणीभूत तसेच गुन्हेगारीला कारणीभूत असणाऱ्या पान टपऱ्या तसेच टीन शेड उध्वस्त करण्याची मोहीम पोलिसांनी ग्रामीण पोलिसांनी हाती घेतली असून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने आज शनिवारी बळीरामपूर येथील अवैध धंद्याची ठिकाणे बुलडोझरच्या माध्यमातून उध्वस्त केली. काही दिवसापूर्वी याच ठिकाणी एक एक खुनाची घटना घडली होती.

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बळीरामपूर येथे मुख्य रस्ता व अंतर्गत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. या ठिकाणी पान टपऱ्या व टिन शेड टाकून गुटखा विक्री, मटक्याचे आकडे घेणे तसेच जुगार आदी अवैध धंदे सुरू होते. ही ठिकाणे गुन्हेगारीचा अड्डा बनत असल्याने ग्रामीण पोलिसांनी आज या पान टपऱ्या, व टीम शेडवरच बुलडोजर चालवला. मागील आठवड्यामध्ये याच ठिकाणी तीन सराईत गुन्हेगारांनी मिळून एकाचा खून केला होता.

यासाठी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आज ही ठिकाणे उध्वस्त करण्याची मोहीम राबवली. गुन्हेगारीवर प्रतिबंध बसावा, गुन्हेगारीची ठिकाणे नष्ट व्हावी तसेच अवैध धंदे कायमस्वरूपी बंद व्हावीत या कारवाई पोलिसांनी बुलडोजर च्या माध्यमातून दारू विक्री होत असलेले तीन टीन शेड, दोन मटका बुकि शेड व १२ पान टपऱ्या उध्वस्त केल्या.

राष्ट्रहित सर्वतोपरी हे विचार जपण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे सदस्य व्हा : प्रणिताताई देवरे

तभा वृत्तसेवा
नांदेड ,दि. ०४ जानेवारी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी परिवाराचे संघटन देशाच्या तळागाळात मजबूत होत आहे.त्यामुळेच समाजसेवा आणि राष्ट्रहित जपण्याची तळमळ मनात बाळगणारे लाखो कार्यकर्ते आज आपल्या भाजपा परिवारात सामील होत आहेत.त्यामुळे आपण एकत्र येऊ या राष्ट्र घडवूया या उदात्त भावनेने संघटनेचे काम केले पाहिजे.संपूर्ण महाराष्ट्रभर महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,राज्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ,संघटन पर्व प्रभारी रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात भाजपा सदस्य नोंदणी अभियान मोठ्या प्रमाणामध्ये राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने कंधार शहरातील नगरेश्वर मंगल कार्यालय येथे शक्तिकेंद्र प्रमुख,बूथप्रमुख यांची कार्यशाळा पार पडली. यावेळी भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा सौ.प्रणिताताई देवरे-चिखलीकर बोलताना म्हणाल्या की,सर्व कार्यकर्त्यांनी एकनिष्ठने काम केल्यास निश्चितपणे भाजपा सदस्य नोंदणी अभियानात कंधार लोहा विधानसभा सर्वात अग्रेसर राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.सध्या संपूर्ण देशभरात भारतीय जनता पक्षाची सदस्यता मोहिम सुरु आहे.ही मोहीम १५ जानेवारी पर्यंत सुरु राहणार असली तरी रविवारी ५ जानेवारीला आपल्याला प्रत्येक बुथवर,प्रत्येक गावात,प्रत्येक शहरात सदस्यता नोंदणी पार पडणार आहे.त्यासाठी लोहा कंधार तालुक्यातील भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी रविवारी ५ जानेवारीला जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचून सदस्य नोंदणी करावी असे आवाहन देखील त्यांनी केले.यावेळी भाजपा प्रदेश सचिव देविदास राठोड,भाजपा नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे,भाजपा जिल्हासरचिटणीस तथा सदस्य नोंदणी अभियान प्रमुख डॉ.माधवराव उच्चेकर,प्रवीण पा.चिखलीकर यांनी सुद्धा कार्यशाळेदरम्यान मार्गदर्शन केले.यावेळी जिल्हा सरचिटणीस चित्ररेखाताई गोरे,वारकड गुरुजी,गंगाधरराव कावडे,भाजपा जिल्हाउपाध्यक्ष भगवान राठोड,प्रभारी तालुकाध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार,भाजपा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष जयमंगला औरादकर,भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गर्जे,निलेश गौर,मधुकर पा.डांगे यांच्यासह मोठ्या संख्येने शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त

पंडीत वाघमारे व चंद्रकांत सुर्यतळ यांना पत्रकारीता पुरस्कार

नायगांव- नायगांव तालुक्यातील दैनिक सामना प्रतिनिधी पंडित वाघमारेनां पत्रकारीतेच्या क्षेत्रातील स्व.अनिल कोकीळ स्मृती पुरस्कार.तर ग्रामीण भागातील दैनिक सकाळचे चंद्रकांत सुर्यतळ या डॉ शंकररावजी चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कारांचे मानकरी ठरले आहे गेल्या काही अनेक वर्षांपासून राज्यातील शहरी भागा सह ग्रामीण भागातील मराठी यासारख्या दैनिक वृत्तपत्रा चे प्रतिनिधी अथवा बातमी दाराचा अपापल्या वृत्तमान पत्रातून लेखणीच्या माध्यमातून समाजातील वंचित घट कानां न्याय मिळवून देण्यासाठी निर्भिड व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिनिधीचे आत्मिक मनोबल उंचवण्या साठी राज्यातील वृत्तमान प्रतिनिधींना जल भारत मिशन व राष्ट्रीय जल जीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत पुरस्कार देण्याची परंपरा कायम ठेवीत. यंदाच्या वर्षातील नायगांव तालुक्यातील दैनिक सामना चे प्रतिनिधी पंडित वाघमारे यांना मिंमासा फाउंडेशन ,दै. समीक्षा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि मंथन क्रिएटिव्ह ग्रुप पत्रकार प्रेस परिषदेच्या वतीने स्व.अनिल कोकीळ स्मृती पत्रकारिता पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.तर तालुक्यातील बरबडा सारख्या ग्रामीण भागातील दैनिक सकाळचे बातमीदार चंद्रकांत सुर्यतळ यांची स्वर्गीय डॉ.शंकरराव चव्हाण साहेब विकास पत्रकारि ता क्षेत्रातील पुरस्कारांचे मानकरी ठरले आहेत. जिल्ह्यातील दरवर्षा प्रमाणे यंदाच्या वर्षातील शहरासह ग्रामीण भागातील पत्रकारिता क्षेत्रांमध्ये पंडित वाघमारे व चंद्रकांत सुर्यतळ यांना पत्रकारितेच्या पुरस्कारासाठी निवड झाल्यामुळे जिल्ह्यासह तालुक्यातील मित्र मंडळी व अप्त स्वकियासह विविध राजकीय ,सामाजिक , व्यवसायिक क्षेत्रातील मान्यवर मंडळींच्या वतीने या दोन्ही प्रतिनिधीवर पुष्पहार रुपी स्वागताने शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे

कावळगाव येथे माता सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

देगलूर-तालुक्यातील जि. प. शाळा कावळगाव येथे भारत देशाच्या पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कावळगाव ता. देगलूर जि. नांदेड यांच्या वतीने साजरी करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त गावातील सर्व क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मिलिंद सोनकांबळे कावळगावकर यांनी केले. सूत्रसंचालन राजुरे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्रीमती चंद्रकला सोनकांबळे, प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख सौ. कुऱ्हाडे मॅडम होते.सत्कार मूर्ती जि. प.प्रा. शाळेचे सौ. चिवटे मॅडम, सौ. बामणे मॅडम, सौ. राजुरे मॅडम, महात्मा गांधी प्राथमिक शाळेचे श्रीमती पाटील मॅडम, श्रीमती स्वामी मॅडम,अंगणवाडी सेविका श्रीमती काळे मॅडम, सौ. बोडके मॅडम, अशा सेविका सौ. झुडपे मॅडम, फुलारी मॅडम, या गावातील सर्व क्षेत्रातील काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील उपसरपंच प्र. बाळासाहेब देशमुख, शालेय समिती अध्यक्ष बस्वराज पटणे, शाळेचे मुख्याध्यापक स्वामी सर, शालेय समिती सदस्य बस्वराज लगडे,व शाळेतील विध्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

ग्राहक पंचायतीच्या अध्यक्षपदी देगलूरकर तर संतोष शिंदे सचिवपदी

तभा वृत्तसेवा
देगलूर ,दि. ०४ जानेवारी

महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रभमांतर्गत येणाऱ्या ग्राहक पंचायतच्या देगलूर तालुका कार्यकारणीच्या सदस्यांची बैठक नुकतीच येथील विश्रामगृहात घेण्यात आली. यामध्ये नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. ग्राहक व विक्रेता यामध्ये सुसंवाद साधून ग्राहकावर अन्याय होणार नाही या संदर्भात ही कार्यकारणी दक्ष राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवीन कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी सुभाष गंगाधर आप्पा देगलूरकर तर सचिव पदी संतोष रामराव शिंदे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली. यावेळी संघटकपदी प्रा. डॉ. रवींद्र बेंबरे, सहससंघटक म्हणून विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी सहसचिवपदी प्रा. डॉ. आनंद वळंकी कर, कोषाध्यक्षपदी चंद्रशेखर लगडे, कायदेविषयक सल्लागार म्हणून एडवोकेट कृष्णा जोशी, प्रसिद्धी प्रमुख म्हणून पत्रकार अनिल कदम तर मार्गदर्शक म्हणून रावसाहेब चाकूरकर यांची निवड करण्यात आली .यावेळी इतर सदस्यात शंकरराव रायकोडे, वैजनाथ स्वामी, सायलु यादव तर महिला प्रतिनिधी म्हणून भार्गवी दीक्षित, अनुसया देगलूरकर यांची निवड करण्यात आली. येत्या ता .८ जानेवारी रोजी येथील तहसील कार्यालयात ग्राहक दिन साजरा करण्यात येणार असून त्यासंदर्भात व्यापारी व ग्राहकांना या कार्यक्रमाला बोलावून ग्राहक दिनाच्या अनुषंगाने व्यापारी व ग्राहक यामध्ये सुसंवाद राहणया संदर्भात योग्य ते मार्गदर्शन केले जाणार असल्याचे पदसिद्ध सचिव तथा तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी सांगितले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची नूतन कार्यकारणी जाहिर

तभा वृत्तसेवा
मुदखेड,दि. ०४ जानेवा

सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे मुदखेड तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची बैठक घेण्यात आली या बैठकीत अशोक मोरे राज्य सचिव मुख्याध्यापक संघ, संजय शिप्परकर, विभागीय अध्यक्ष, मराठवाडा मुख्याध्यापक संघ, तसेच विश्वनाथ चंदलवाड विभागीय सदस्य, मराठवाडा मुख्याध्यापक संघ यांच्या उपस्थितीत मुदखेड तालुका मुख्याध्यापक संघाची बैठक संपन्न झाली.

या बैठकीत मुदखेड माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी विजयकुमार बेंबडे मुख्याध्यापक सरदार पटेल हायस्कूल मुदखेड यांची निवड करण्यात आली, तर कार्याध्यक्षपदी डॉ स्वप्नील बनसोडे मुख्याध्यापक यशवंतराव चव्हाण हायस्कूल निवघा, उपाध्यक्षपदी बाबुराव नाईक प्राचार्य महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुदखेड, सचिवपदी अजय सरसे मुख्याध्यापक राजश्री शाहू विद्यालय मुदखेड, सहसचिवपदी बालाजी जाधव प्राचार्य स्वामी विवेकानंद जुनियर कॉलेज माळकौठा, कोषाध्यक्षपदी रामकिशन चुबेवार मुख्याध्यापक स्वातंत्र्य सेनानी राजाराम बापू माध्यमिक विद्यालय बारड, प्रसिद्धी प्रमुखपदी गणेश मोरे प्राचार्य माध्यमिक आश्रम शाळा मुदखेड, सदस्यपदी संदीप पांगरे मुख्याध्यापक अपरंपार स्वामी विद्यालय डोंगरगाव, भगवान ढेपे मुख्याध्यापक माध्यमिक आश्रम शाळा मुगट, हेमंत इंगळे प्राचार्य शिवाजी जुनिअर कॉलेज बारड, सौ शिल्पा सवंडकर मुख्याध्यापिका कस्तुरबा गांधी विद्यालय मुदखेड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

नवनियुक्त कार्यकारिणीचे स्वागत व अभिनंदन राज्याचे सचिव अशोक मोरे, विभागीय अध्यक्ष संजय शिप्परकर व विभागीय सदस्य विश्वनाथ चंदलवाड तसेच सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल मुदखेड चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

भाजप सदस्य नोंदणीसाठी भोकर विधानसभेत आजपासून विशेष मोहीम

तभा वृत्तसेवा
नांदेड ,दि. ०४ जानेवारी

भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण भारतीय जनता पक्षाच्या सदस्य नोंदणीसाठी रविवारपासून आपल्या मतदारसंघात विशेष जनसंपर्क मोहीम राबवणार आहेत.

सध्या देशभरात भारतीय जनता पक्षाची सदस्य नोंदणी सुरु आहे. भोकर विधानसभा मतदारसंघात भाजप सदस्य नोंदणी अभियानाला अधिक गती देण्यासाठी आ. श्रीजया चव्हाण यांनी ५ ते ११ जानेवारी दरम्यान विशेष जनसंपर्क मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेंतर्गत रविवारी ५ जानेवारीला भोकर, अर्धापूर, मुदखेड, मालेगाव, भोकर फाटा व बारड, ६ जानेवारीला कोंढा, ७ जानेवारीला भोसी, ८ जानेवारीला कामठा बु., ९ जानेवारीला भोकर व मालेगाव, १० जानेवारीला अर्धापूर तर ११ जानेवारीला लहान, पाळज, बारड येथे विशेष कक्ष उभारून भाजपची सदस्य नोंदणी केली जाणार आहे. ७ ते १० जानेवारी दरम्यान आ.श्रीजया चव्हाण यांच्या उपस्थितीत भोकर विधानसभा मतदारसंघातील तीनही तालुक्यात बैठकी व नोंदणीचे कार्यक्रम होणार आहे. या मोहिमेत भाजपच्या विविध प्रकोष्ठमार्फतही सदस्य नोंदणी अभियान राबवले जाईल. नागरिकांनी मोठया संख्येने ८८००००२०२४ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाचे सदस्य व्हावे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेला आपले समर्थन द्यावे, असे आवाहन आ. श्रीजया चव्हाण यांनी केले आहे.

भाजपा सदस्य नोंदणी अभियानाच्या विधानसभा संयोजकपदी बाबुराव केंद्रे

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. ०४ जानेवारी

विधानसभा निवडणूक प्रमुख म्हणून उत्तमरीत्या जबाबदारी सांभाळलेले भाजपा ओबीसी आघाडीचे नेते बाबुराव केंद्रे यांच्यावर पक्षाने अजून एक महत्वाची जबाबदारी सोपविली असून संघटनात्मक कौशल्य व दांडगा जनसंपर्क लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांच्या शिफारशीवरून जिल्हाध्यक्ष एड. किशोर देशमुख यांनी केंद्रे यांची भाजपा सदस्य नोंदणी अभियानाच्या किनवट माहूर विधानसभा संयोजक पदी नियुक्ती केली आहे.

१ जानेवारीपासून भारतीय जनता पक्षाने भाजपा सदस्य नोंदणी अभियान राज्यभरात सुरू केले. हे अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने आमदार भीमराव केराम यांनी लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठक घेऊन या अभियानाबद्दल विस्तृत माहिती दिली.किनवट विधानसभा क्षेत्रात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी बैठकीत केले. दरम्यान हे अभियान बुथस्तरावर यशस्वी बुथस्तरावर यशस्वी करण्यासाठी संघटनात्मक कौशल्य व दांडगा जनसंपर्क ठेऊन असलेले विधानसभा निवडणूक प्रमुख तथा ओबीसी आघाडीचे नेते बाबुराव केंद्रे यांची भाजपा सदस्य नोंदणी अभियानाच्या किनवट माहूर विधानसभा संयोजक पदी नियुक्ती केली आहे.आमदार भीमराव केराम यांच्या शिफारशीवरून जिल्हाध्यक्ष एड.किशोर देशमुख यांनी ही नियुक्ती केली आहे. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना बाबुराव केंद्रे म्हणाले की पक्षाच्या आदेशानुसार व आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली मी पक्षाची विचारधारावर व ध्येयधोरणे किनवट विधानसभा क्षेत्रातील घराघरात पोहोचविण्याचे काम केले. प्रत्येक जाती समूहातील कार्यकर्त्याला पक्षाशी जोडण्याचा प्रयत्न केला. सदस्य नोंदणी अभियानाचा संयोजक म्हणून किनवट माहूर विधानसभा क्षेत्रातील ३३१ बुथवर ५ जानेवारी रोजी २५ हजार सदस्य नोंदणी करण्याचा आमचा संकल्प आहे असे त्यांनी सांगितले.

आ. कोहळीकरांच्या सत्कारासह माजी खा. वानखेडेंचा वाढदिवस उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
हदगाव,दि. ०४ जानेवारी

नवनिर्वाचित विधानसभा सदस्य आ. बाबुराव कदम कोहळीकर, विधान परिषद सदस्य आ. हेमंत पाटील यांचे नागरी सत्कार व माजी खा. सुभाषराव वानखेडे यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन सोहळा हदगाव शहरात अतिशय थाटात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, डॉ. अंकुश पाटील देवसरकर, आबा वानखेडे, भास्कर वानखेडे, बबन कदम कार्यक्रमाचे संयोजक अनिल पाटील बाभळीकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी तथा माजी पदाधिकारी तसेच उमरखेड, हिमायतनगर इथून आलेले महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांची हदगाव शहरातून भव्य अशी मिरवणूकीने करण्यात आली होती या मिरवणुकीत आदिवासी नृत्य, बंजारा नृत्य, बैलगाडी तसेच मान्यवर खुल्या वाहनातून मिरवणुकीतून जात असताना जेसीबीच्या सहाय्यातून भल्ला मोठा हाराने त्यांचे स्वागत करण्यात आल्याचे क्षण या कार्यक्रमाची शोभा आणखीनच वाढवत होते . तर ठीक- ठिकाणी आतिषबाजी ही करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या सत्कारास आ. कोहळीकर म्हणाले की, पुढचे पाच वर्षात आपल्या सर्वांच्या सहकार्याने या भागाचा खुंटलेल्या विकास पुढे करायचे आहे.कमीत कमी हदगाव शहरासाठी नगरपालिकेच्या माध्यमातून ५०० कोटी रुपयांचा निधी आणण्याचा आपला मानस असल्याचे सुद्धा त्यांनी यावेळी सांगितले तर माजी खा. वानखेडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आता लोकप्रतिनिधी यांची जबाबदारी वाढली असून येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणूक, पंचायत समिती निवडणूक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रत्येक ठिकाणी आपला भगवा फडकलाच पाहिजे यासाठी जोमाने काम करण्याची गरज असल्याचे सांगितले यावेळेस त्यांनी विरोधकांवर चौफेर टीका करत भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरती चांगलाच खरपूस समाचार घेतला. अध्यक्षीय भाषणात आ. हेमंत पाटील म्हणाले की, आता आपल्याच विचारसरणीचे राज्यात व केंद्रात सत्ता असून याचा नक्कीच फायदा आपल्या मतदार संघात विकास निधी खेचून आणण्यात होणार असून राहिलेले काही अपूर्ण कामाचे लवकरच पूर्णत्व कडे घेऊन जाण्याची अभिवचन सुद्धा या वेळेस आ. हेमंत पाटील यांनी दिली.

यावेळेस विविध मान्यवर, व्यापारी, पोलीस पाटील, पत्रकार बांधव यांच्यासह कार्यकर्त्यांनी उपस्थित मान्यवरांचे अभिष्टचिंतन सोहळा व नागरी सत्कार सोहळ्यास हार ,शाल व श्रीफळ देत मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम पार पडला.

विद्याविकास विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
बाऱ्हाळी,दि. ०४ जानेवारी

स्त्रियांना चूल आणि मूल ही परंपरेला बाजू देत शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या अध्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बा-हाळी येथील विद्या विकास विद्यालयात साजरी करण्यात आली .

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य अशोक पंचगट्टे, तर प्रमुख म्हणून पी. व्ही. जोशी टी. डी. दावलपुरे पी.एस .महाजन ,बी. जे परमाळे, डी.व्ही पोतंगले ,सौ.पी एम कोटलवार ,एस एस शेख यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाच्या सुरुवातीस सौ पी .एम कोटलवार यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी बोलताना सौ पी एम कोटलवार म्हणाल्या की स्त्रियांना शिक्षणाची प्रगतीचे द्वारे खुले करून स्त्रियांना अज्ञान अंधारातून नष्ट करणाऱ्या आद्य शिक्षिका म्हणजे सावित्रीबाई फुले होय त्यांच्यामुळे आज लेकी देशाच्या राष्ट्रपती ,पंतप्रधान मुख्यमंत्री, डॉक्टर ,इंजिनिअर, प्रशासकीय अधिकारी बनत आहेत .यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेतशाळेच्या विद्यार्थिनी उपस्थित राहून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस .टी सुळे यांनी तर आभार बी .जे परमाळे यांनी मांनले.

जाहीर प्रगटन

नांदेड येथील अति. सह जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात

एम.ए.सी.पी. क्रं. ६१/२०१९,

दयानंद वि. रोहिदास व इतर

प्रतिवादी---(१)
Rohidas S/o Manchak Kedar,
Age major Occu. Business
R/o Ambaltek, Post Ghatnandur,
Tq. Ambejogai, Dist. Beed-431519 (Owner of Truck bearing Registration No. MH-24/B-6970)

दावा:-कलम १६६ मोटार अपघात कायदा १९८८ मावेजा रू. ३,००,०००/- बाबत

ज्याअर्थी आपणांस जाहीरप्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार दयानंद मरिबा गजभारे वय ३३ रा. पंकज नगर धनेगांव ता. जि. नांदेड यांनी आपल्या विरूध्द कलम १६६ मोटार अपघात प्रकरण दाखल केलेला आहे. सदरील प्रकरणात आपण प्रतिवादी असुन आपल्यावर बऱ्याचवेळा समन्स/नोटीस पाठविण्यात आल्या, परंतु आपण सदरील समन्स घेण्यास जानुन बुजून टाळाटाळ करत आहात असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणास कळविण्यात येते की, दिनांक १५.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. अति. सह जिल्हा न्यायालय-१, नांदेड येथे हजर रहावे अन्यथा आपणा विरुध्द आपणास काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन आपले विरूध्द एकतर्फा आदेश करण्यात येईल, या संबंधी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी
न्यायालयाच्या शिक्यानिशी व सहीनिशी दिले.

आदेशानुसार,
सहा. अधिक्षक
अति. सह जिल्हा न्यायालय-१,
नांदेड.

कनिष्ठ लिपीक,

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daniktarunbharat.com

गेवराईच्या कृषी प्रदर्शनातून शेतकऱ्यांना दिशा देण्याचं काम-खा.रजनीताई पाटील

प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी प्रगत शेती करत उत्पन्न वाढीवर भर द्यावा - मनोज जरांगे पाटील

गेवराईत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय कृषीप्रदर्शनाचे उदघाटन संपन्न

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.४ जानेवारी)

स्व. कृषिरत्न गणेशराव बेदरे यांच्या कार्याचा वसा घेऊन ग्रामीण भागात एवढं भव्य दिव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरवत महेश बेदरे हे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिशा देण्याचे काम करत आसल्याचे प्रतिपादन राज्यसभा रजनीताई पाटील यांनी केले. तर शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून यंत्र सामग्रीचा वापर करत प्रगत शेती करून उत्पन्न वाढीवर भर द्यावा असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

गेवराई येथील कृषिविकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उदघाटन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर नारायण गडाचे मठाधिपती श्री. ह.भ.प. महंत शिवाजी महाराज नारायणगडकर, खा.राजनीताई पाटील, संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील, आ.विजयसिंह पंडित, परभणी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. इंद्रमणी, आदित्य पाटील, पशुपतीनाथ दांगट, गणेश बजगुडे, गंगाधर काळकुटे, किशोर सोनवणे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना या प्रदर्शनातून नवनवीन यंत्र सामग्री वापरात आणून शेतीसाठी वेगवेगळे प्रयोग करत उत्पन्न वाढीसाठी फायदेशीर ठरत आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अतिशय उपयुक्त ठरणारे हे कृषी प्रदर्शन गेवराई सारख्या भागात होत आहे ही तुमच्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. गेल्या १६ वर्षांपासून स्व.गणेश बेदरे यांनी सुरू केलेला हा यज्ञ महेश तुम्ही पुढे नेत आहात ही कौतुकास्पद बाब असल्याचे सांगत कृषिभूषण महेश बेदरे यांचे कौतुक केले.

या प्रदर्शनात खुप नवीन यंत्र पहायला मिळत आहेत. याची माहिती घेऊन वापर करत शेतकऱ्यांनी आपल्या उत्पादनात वाढ करण्यासाठी या प्रदर्शनातून काही न काही घेऊन जावे व नवीन तंत्रज्ञान वापरून शेती करावी असे असे आवाहन संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी केले. तर या भव्यदिव्य अयोजनाबद्दल त्यांनी महेश बेदरे यांच्या कार्याचे कौतुक केले. दरम्यान हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, स्वागताध्यक्ष भाऊसाहेब नाटकर ,निमंत्रक शिनु भाऊ बेद्रे , कार्याध्यक्ष भाउसाहेब शिंदे, कृषी उद्यान पंडित राजेंद्र आतकरे, राजेंद्र मोटे, राजेंद्र बेदरे, राजाराम पवार, भागवत जाधव, सतीश केसभट, संभाजी जाधव आदींनी परीश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषिभूषण महेश बेदरे यांनी, सूत्रसंचालन विनोद पौळ यांनी तर राजेंद्र मोटे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

भविष्यात या प्रदर्शनाचे स्वरूप यापेक्षा ही भव्यदिव्य व्हावे यासाठी माझे सहकार्य राहील - आ.विजयसिंह पंडित

गेल्या १६ वर्षांपूर्वी स्व.कृषिरत्न गणेश नाना बेदरे यांनी सुरू केलेले हे प्रदर्शन आता त्यांचे सुपुत्र महेश बेद्रे यांनी अविरत चालू ठेवून ही परंपरा कायम राखली. शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे असणारे हे कृषी प्रदर्शन त्यांनी दरवर्षी भरवत शेतकऱ्यांना नव तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत कसं पोहोचवता येईल हा उद्धेश समोर ठेवून अतिशय चांगल्या पद्धतीने आयोजन नियोजन ते करत आहेत. या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना पुढच्या काळामध्ये या प्रदर्शनाचे स्वरूप कसं भव्यदिव्य होईल याच्यासाठी माझे प्रयत्न व सहकार्य राहील अशी ग्वाही गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रसंगी बोलताना दिली.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

माणूस घडवण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले-प्रा. बोडके

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.४ जानेवारी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील महिला कक्षाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. के. सानप होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभागप्रमुख प्रा.बालाजी बोडके होते तर यावेळी उपप्राचार्य डॉ.एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए.कव्हळे, प्रा. सुरेश देशमुख, महिला कक्ष प्रमुख प्रा.अर्चना कचरे यांची प्रमुख उपस्थिती होती.सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील महिला कक्षाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना प्रा. बालाजी बोडके म्हणाले की आज प्रत्येक क्षेत्रात महिला जी भरारी घेत आहेत त्यात सावित्रीबाईं फुलेंचे योगदान सर्वश्रेष्ठ आहे.माणूस तयास म्हणावे? जो बुद्धी ज्ञान आणि विद्येच्या आधारावर मानवी जीवन समृद्ध आणि विकसित करतो. हे सावित्रीबाई फुलेंनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जी. के.सानप म्हणाले की, आज स्त्रिया विविध क्षेत्रातनावलौकिक प्राप्त करत आहेत. त्याचा खरा पाया सावित्रीबाई फुले यांनी घालून दिला.त्यामुळेच स्त्रिया स्वकर्तृत्व सिद्ध करताना दिसत आहेत .यावेळी महिला कक्षप्रमुख डॉ.अर्चना कचरे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. उज्वला कदम यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. वैशाली शहाणे यांनी केले तर आभार प्रा. एन. जे. वडमारे यांनी मानले.कार्यक्रमाला प्रा. संगीता शेजुळ, प्रा. वैशाली भिसे,प्रा पुरी मॅडम, प्रा. सीमा एरंडे, प्रा. मोहिनी हिरवे, श्रीमती अरुणा स्वामी, श्रीमती मीना डक,शेख शबाना, श्रीमती मुसळे यांच्यासह विद्यार्थिनी - विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

श्री संस्कार इंग्लिश स्कुलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
केज दि.४ जानेवारी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये आज स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे कार्यक्रमाच्या अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पूजन करुन अभिवादन करण्यात आले. व श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील चिमुकल्यांनी सावीत्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर उत्स्फूर्त भाषणे केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचोली माळी गावच्या सरपंच सौ.रोहीणीताई सुनील देशमुख या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बँक चिंचोली माळी च्या शाखा व्यवस्थापक सौ. साबळे मॅडम व प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली माळी च्या वैद्यकीय अधिकारी डॉ शिला कांबळे मॅडम, सौ. मंगल गलांडे ग्रामपंचायत सदस्या, सौ. सिमा काळे मॅडम, प्रिंसीपल श्री संस्कार इंग्लिश स्कूल चिंचोली माळी, ह.भ.प.गुरुवर्य आबा महाराज मेहरकर हे होते.यावेळी सर्व प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाच्या अध्यक्षा यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सिमा काळे, शिक्षीका सौ. पुजा देशमुख मॅडम, सौ निलम जोगदंड मॅडम, सौ. रेश्मा गायकवाड मॅडम, सौ. सोनाली खंदारे मॅडम, सौ. प्रियंका शिंदे मॅडम, सेविका पुनम चंदनशिव, संस्थेचे पदाधिकारी अमोल गलांडे, चालक अमजत पठाण, लहु राऊत, संचित गलांडे यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ पुजा देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले.

महात्मा फुले चौक येथे रक्तदान शिबीर

जिजाऊ-सावित्रीच्या लेकीसह ३६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.४ जानेवारी

महात्मा फुले चौक फुलेपिंपळगाव रोड केसापुरी कॅम्प येथे १० वर्षाची परंपरपरा राखत प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी राजमाता जिजाऊ,व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले याच्या संयुक्त जन्मोत्सवा निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन जिजाऊ, सावित्री जन्मोत्सव समिती व जानसा सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्येमाने करण्यात आले होते हा उपक्रम दि.३ जानेवारी रोजी सलग १० वर्षापासुन फुलेपिंपळगाव येथे राबवल्या जात आहे या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.००वा राजमाता जिजाऊ व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमांचे पुजन करुन करण्यात आले रक्तदान शिबीराचे उदघाटन छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन,माजलगाव विधानसभेचे नेते मोहनदादा जगताप यांनी केले या प्रसंगी प्रा संजय बागुल सर ,माजी सरपंच दशरथ उंबरे,माजी सरपंच अभिमन्यू साळवे ,सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन सुमंत घाटुळ,सदधम्म सेवासंघाचे सोपान उजगरे,सेवा सहकारी सोसायटी चे संचालक डि एस दादा साळवे, एकता परिषद चे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे, साईंभक्ती ट्रव्हल्स चे मालक विलास सामाले, माजलगाव पिपल्स अर्बन चे चेअरमन निशात साळवे,सौभाग्य मंगलकार्यालयाचे मालक संतोष कोरडे,आसाराम फुलगे ,नाना उंबरे,बहुजन समाज पार्टी चे हरिभाऊ साळवे , भारतीय बौद्ध महासभेचे बाबासाहेब घनघाव ,दयानंद साळवे,मोहन काकडे,दत्तात्रय खामकर, बौद्धाचार्य विजय साळवे, दत्तात्रय प्रधान,अक्षय त्रिभुवन,केसापुरीचे माजी ग्रामपंचायत सदस्य,बाळु गायसमुद्रे, महानायक ग्रुपचे जायकोबा राठोड , ज्ञानेश्वर कदम,राजेभाऊ जोगडे,भैय्या प्रधान, सुभाष गंगाधर साळवे,चिंतामन कोरडे,सह रक्तदाते व गावकरी उपस्तीत होते,या शिबीरामध्ये सरला सामाले,मनिषा ससाने,सुनंदा थळकर,ऋतुजा वेलापुरे,या जिजाऊ सावित्री च्या लेकी सह ३६ रक्तदात्यांनी केले रक्तदान या कार्यक्रमा चे सुत्रसंचलन, डॉ भागवत साळवे यांनी केले ,हे शिबीर यशस्वी करण्यासाठी राजाभाऊ वजीर,सुरज खळगे, बाळु उगले अशोक साळवे, नामदेव चिंचाने,विठल कुरे,गोविंद खामकर,अर्जुन फुलगे, सतिष उंबरे,,संदिप उंबरे,विलास उंबरे, अभिषेक कोरडे, सचिन ससाने, आनंद किरवले, वैभव खळगे, निवृत्ती नवघरे,अनिल खामकर,सचिन सरवदे,यांनी परिश्रम घेतले

दीनदयाळ बँकेच्या युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचे १० ते १२ जानेवारी दरम्यान आयोजन

● दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांची माहिती

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.४ जानेवारी

विश्वास, विकास आणि विनम्रता या त्रिसुत्रीने आर्थिक क्षेत्रात कार्यरत दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अंबाजोगाईकरांनी व बँकेच्या सर्व सभासदांनी नियोजित वेळेत उपस्थित राहून व्याख्यानमालेचा सहकुटूंब, सहपरिवार लाभ घ्यावा असे नम्र आवाहन बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

याबाबत बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी सांगितले की, दीनदयाळ बँकेने ३१ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत उत्तम टीमवर्क करून ५२२ कोटी रूपयांच्या ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. तर एकूण व्यवसायाचा ८५३ कोटींचा पल्ला ही गाठला आहे. लवकरच ३१ मार्च २०२५ अखेरपर्यंत १००० कोटी रूपयांच्या व्यवसायाचे लक्ष्य बँकेने समोर ठेवले आहे. लवकरच ते ही साध्य होईल. आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असताना सामाजिक उत्तरदायित्व व जबाबदारीचे भान ठेवून समाजाचे आपण काही देणे लागतो. याच जाणिवेने अंबाजोगाईकरांना मागील २२ वर्षांपासून व्याख्यानमालेच्या माध्यमातून वैचारिक मेजवानी देण्याचे काम दीनदयाळ नागरी सहकारी बँक अव्याहतपणे करीत आहे. या उपक्रमाचे हे २३ वे वर्ष आहे. या उपक्रमांतर्गत आजपावेतो सदर व्याख्यानमालेत अनेक थोर विचारवंत, कलावंत, लेखक, साहित्यिक, पत्रकार, अर्थतज्ज्ञ, इतिहास संशोधक, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी रसिकांना वैचारिक मेजवानी देवून वेळोवेळी आपले अनमोल विचार मांडलेले आहेत. यावर्षी ही युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त १० ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान दररोज सायंकाळी ६.३० वाजता (तीनही दिवस) खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, कुत्तर विहिर, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित व्याख्यानमालेसाठी शुक्रवार, दि.१० जानेवारी रोजी प्रा.अभय भंडारी (विटा, जि.सातारा) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'स्वामी विवेकानंद आणि भारतीय राष्ट्रवाद' असा आहे. भंडारी हे प्रसिद्ध व्याख्याते आहेत. आजपावेतो त्यांनी विविध ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. ते अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ही सर्वत्र ओळखले जातात. तसेच शनिवार, दि.११ जानेवारी रोजी प्रकाश पाठक (चार्टर्ड अकौन्टटस, धुळे) यांचे 'पंचप्रण' - सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर व्याख्यान होईल. पाठक हे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील जाणकार व्यक्तीमत्व म्हणून ही सर्वदूर ओळखले जातात. ते आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत आहेत. बँकेच्या वतीने दि.११ जानेवारी रोजी 'सहकार भारती स्थापना दिवस' ही साजरा करण्यात येईल. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा-संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला - २०२५ चा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालिका तसेच महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल या विभागाच्या कॅबिनेट मंत्री ना.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, संचालक श्री.रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, सर्व संचालक श्री.विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षिरसागर, प्राचार्य किशन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर तसेच सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद यांनी बँकेच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

सुवर्णपदक विजेता धावपट्टू अनिकेत खंडागळे पालकांचा काँग्रेसच्या वतीने सन्मान

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.४ जानेवारी

नेपाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या इंडियन नेपाळ इंटरनॅशनल युवा सिरीज २०२४-२५ या स्पर्धेमध्ये शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या मालीपारगावचे सुपुत्र अनिकेत बाजीराव खंडागळे याने ४०० मीटर धावणे मध्ये सुवर्णपदक पटकावले होते.

अतिशय बिकट परस्तिथीवर मात करून आई वडील या दोघांनी मोठ्या हिमतीने सुवर्णपदक विजेता धावपट्टू अनिकेत खंडागळे याला धावणे या खेळ प्रकारात विविध स्वरूपाचे बळ दिलं असल्यामुळे आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी हे श्रय आई वडील यांना देत खऱ्या सन्मानाचे हकदार पालक असे मानून भारतीय काँग्रेस पक्ष्याच्या वतीने अंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेता धावपट्टू अनिकेत खंडागळे यांच्या पालकांचा सपतनिक गुलाबपुष्पहार, मानाचा शेला, घालून पेढे भरवत सत्कार करून सन्मान केला.

तसेच समाज बांधवांनी आत्ता शिक्षणाला खेळाची जोड देत आपल्या पाल्यांना खेळाच्या माध्यमातून हल्लीच्या स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी समाजाला उद्देशून आवाहन केले आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते विक्रम वाघमारे, मुकुंद हिवाळे, राहुल हिवाळे सह खंडागळे परिवारातील सदस्य उपस्थित होते.